नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष १६ * अंक ३०१ * | * भंडारा * | रविवार, दिनांक २७ एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात..

### तहव्वूर राणाची ८ तासांहून अधिक चौकशी

■ **मुंबई :** मुंबईतील 26/11 च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वुर राणाची मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने दिल्लीत जाऊन चौकशी केली. आठ तासांहून अधिक वेळ ही चौकशी चालली. मुंबई पोलिसांनी म्हटले की, चौकशीदरम्यान राणा सहकार्य करत नव्हता आणि त्याने प्रश्नांची उडवाउडवीची उत्तरे दिली.

### दहावी- बारावीचा निकाल मे महिन्यात जाहीर होणार

■ **मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळतर्फे घेण्यात आलेल्या दहावी बारावीच्या 21 लाख विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर होणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. याबाबत लवकरच तारीख जाहीर केल्या जातील, असे बोर्डाकडून सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ही माहिती दिली.

### इस्त्रोच्या माजी प्रमुखांचे ८४ व्या वर्षी निधन



■ **बंगळुरू :** इस्त्रोचे माजी प्रमुख कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचे बंगळुरू येथे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांचे पार्थिव रविवार, २७ एप्रिल रोजी रमण रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये जनतेच्या दर्शनासाठी ठेवण्यात येईल.

त्यांना २ वर्षांपूर्वी किरकोळ हृदयविकाराचा झटका आला होता. तेव्हापासून कस्तुरीरंगन आजारी होते. सध्या ते राजस्थान केंद्रीय विद्यापीठ आणि एनआयआयटी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत होते.

के कस्तुरीरंगन यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९४० रोजी कोची राज्यातील एनार्कुलम येथे झाला. त्यांनी विज्ञान विषयात पदवी प्राप्त केली आणि मुंबई विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. कस्तुरीरंगन यांनी खगोलशास्त्रात डॉक्टरेट पदवी मिळवली होती.

## पाकिस्तानी नागरिकांना परत पाठविण्याची
# कार्यवाही युद्धपातळीवर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून, त्यांना परत पाठविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरु आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मिरातील पर्यटकांना परत महाराष्ट्रात आणण्यासाठी राज्य सरकारने केलेले तिसरे विशेष विमान 232 प्रवाशांना घेऊन आज मुंबईत दाखल झाले. मंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. यातील अकोला, अमरावती येथील प्रवाशांच्या पुढच्या प्रवासासाठी बसेसची व्यवस्था सुद्धा करण्यात आली. आतापर्यंत सुमारे 800 पर्यटक महाराष्ट्रात परतले आहेत.

फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून, महाराष्ट्रात प्रत्येक पोलिस स्थानकाला त्याची सूचना दिली जात आहे. कोणताही पाकिस्तानी नागरिक 48 तासांपेक्षा अधिक काळ महाराष्ट्रात राहू नये, याची काळजी घेतली जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली जात असून, जो कुणी अधिक काळ वास्तव्य करताना आढळेल, त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा झाली असून, त्यांनी दिलेल्या दिशानिर्देशानुसारच ही कारवाई होईल. शत्रूचा हल्ला किंवा देशावरील संकटकाळात कायमच सर्व राजकीय पक्ष राहिले, असेच या देशात आजवर झाले. उबाठाने जे छोटे मन दाखविले, त्याला या देशातील जनता कधीच माफ करणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.

## तरुणांसाठी संधींचा काळ
### ५१ हजार तरुणांना नोकरी पत्रे वाटप

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सकाळी ११ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे १५ व्या रोजगार मेळाव्यात सहभाग घेतला. त्यांनी केंद्र सरकारच्या विविध विभागांमध्ये ५१,००० हून अधिक तरुणांना नोकरी पत्रे वाटली.



कार्यक्रमाला संबोधित करताना मोदी म्हणाल, तरुणांसाठी हा अभूतपूर्व संधींचा काळ आहे. देशात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढत राहाव्यात यासाठी सरकार अनेक पावले उचलत आहे. देशभरात ४७ ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा हवाला देत मोदी म्हणाले, 'भारत सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था राहील.' ऑटोमोबाईल आणि पादत्राणे उद्योगातील उत्पादन आणि निर्यातीने नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाले आहेत.

पंतप्रधानांनी निदर्शनास आणून दिले की २०१४ पूर्वीच्या १८ दशलक्ष टनांवरून अंतर्गत जलमार्गांद्वारे होणारी मालवाहतूक १४५ दशलक्ष टनांपर्यंत तर राष्ट्रीय जलमार्गांची संख्या ११० पर्यंत वाढली आहे.

## प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंच्या दाव्यावर
# शिंदेंनी जोडले हात

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :**
भाजप प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी फडणवीस हेच 2034 पर्यंत मुख्यमंत्री राहतील असा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्यावर माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'हात जोडत' बोलणे टाळले. महायुतीत या मुद्यावरून मोठी ताणातान होण्याची शक्यता आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत वरोरा येथे माजी मंत्री स्व. संजय देवतळे यांचा स्मृतिदिन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात बोलताना त्यांनी 2034 पर्यंत देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रीपदी कायम राहतील असा दावा केला.

देवेंद्र फडणवीस हे सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री आहेत. त्यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. ते 2034 पर्यंत मुख्यमंत्रीपदी कायम राहतील. आपल्याला त्यांनाच पुढे करायचे आहे. मोदी आणि देवेंद हे डबल इंजिन सरकारच महाराष्ट्राचे भले करू शकते. सर्वांनी त्यांच्या मागे ताकद उभी केली पाहिजे, असे ते म्हणाले होते.

बावनकुळे यांच्या या दाव्याविषयी पत्रकारांनी शिंदे यांना छेडले असता त्यांनी त्यावर बोलणे टाळले. त्यांनी केवळ शुभेच्छा म्हणत हात जोडले व तेथून काढता पाय घेणे पसंत केले. दुसरीकडे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी 2034 कशाला 20280 पर्यंत त्यांना मुख्यमंत्री राहू द्या असे म्हणत भाजपला टोला हाणला आहे.

## पुण्यातील पर्यटकाच्या कॅमेऱ्यात
# संशयित अतिरेकी कैद

### पहलगाम हल्ल्यातील मोठा पुरावा : एनआयएला दिली माहिती

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे 22 एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरून गेला आहे. या भीषण हल्ल्यात 26 निष्पाप पर्यटकांचा जीव गेला. या हल्ल्यानंतर भारतीय तपास यंत्रणा पूर्णपणे अलर्ट मोडवर असून जम्मू-काश्मीरच्या विविध भागांत मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू आहे.

दरम्यान, या हल्ल्यात सहभागी असलेले दोन संशयित दहशतवादी पुण्यातील पर्यटकांच्या मोबाईलमध्ये कैद झाले आहेत. पहलगाम हल्ल्यातील हा महत्त्वाचा पुरावा मानला जात आहे. श्रीजीत रमेशन असे पयर्टकाचे नाव असून त्यांनी हा पुरावा एनआयएकडे दिला आहे.



पुण्यातील देहूरोड येथील रहिवासी श्रीजीत रमेशन हे 18 एप्रिल रोजी आपल्या कुटुंबासह काश्मीरमध्ये फिरायला गेले होते. ते पहलगामपासून अवघ्या सात-साडेसात किलोमीटर अंतरावर असलेल्या प्रसिद्ध बेताब व्हॅलीमध्ये फिरत होते.

बेताब व्हॅलीमध्ये फिरताना श्रीजीत आपल्या मुलीचा मोबाइलवर व्हिडिओ (रिल्स) शूट करत होते. याच दरम्यान, त्या व्हिडिओमध्ये दोन संशयित दहशतवादी त्यांच्या मुलीच्या पाठीमागून जाताना स्पष्टपणे दिसत आहेत. श्रीजित रमेशन यांनी याबाबतची माहिती एनआयएला दिली असून या व्हिडिओ आणि फोटोची संपूर्ण तपासणी एनआयकडून केली जात आहे.

**काय म्हणाले श्रीजीत रमेशन**

आम्ही 18 तारखेला पहलगामला गेलो, जिकडे 22 तारखेला हल्ला झाला. बेताब व्हॅली परिसरात आम्ही गेलो असताना माज्या सहा वर्षीय मुलीचे रील शूट करीत असताना तिच्या मागून दोन संशयित लोक गेले. आम्ही काश्मीरवरून सुखरुपरित्या घरी पोहोचलो.


घरी आल्यावर हल्ल्याची वार्ता आम्हाला समजली. तसेच टीव्हीवरून दहशतवाद्यांचे फोटो आम्ही ज्यावेळी पाहिले, त्यावेळी हेच दोन दहशतवादी रिल्समध्ये शूट झाल्याचे आमच्या लक्षात आले.

आम्ही पहलगाम, बेताब व्हॅली या ठिकाणचे सगळे फोटो, रिल्स, व्हिडीओ तपासले. त्यावेळी आमच्या असे लक्षात आले की यांच्या हालचाली संशयित होत्या. चारमधील दोन दहशतवाद्यांचे चेहरे आमच्या मोबाईलमधल्या फोटोंशी जुळत होते.

आम्ही लगोलग दिल्ली एनआयएमधील अधिकाऱ्यांना फोन करून संबंधित प्रकार कळवला. त्यांनी आम्हाला एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा मोबाईल नंबर दिला ज्यावर आम्ही संपूर्ण फोटो आणि व्हिडीओ पाठवले आहेत. फोटो आणि व्हिडीओ पाहिल्यानंतर एनआयए अधिकारी त्याची पुष्टी करतील, असे श्रीजीत रमेशन म्हणाले. दुसरीकडे आतंकवादी लष्करी गणवेशात आल्याचे सांगितले जात असताना यात ते साध्यात गणवेशात दिसत असल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.









## पावसाच्या सरी काय आहे हवामान खात्याचा अंदाज?

**मुंबई, दि. २६ :** मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये काही भागात शुक्रवारी मध्यरात्री अचानक वादळी वाऱ्यांसह पावसाच्या सरी बरसल्या. दक्षिण मुंबईतील काही परिसरात आणि विशेषतः मध्य उपनगर, ठाणे, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई आणि पनवेल परिसरात पावसाची नोंद झाली. ढगांच्या गडगडाटासह काही भागांत सरी कोसळल्या. तरीदेखील, पुढील दोन ते तीन दिवस मुंबईत कोरडे वातावरण राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले असले तरी, मुंबईत पावसाबाबात अजूनतरी हवामान विभागाने कोणताही अंदाज व्यक्त केलेला नाही.

## वाढत्या तापमानामुळे नेत्रसंसर्गाचा धोका



**मुंबई, दि. २६ :** वाढत्या तापमानामुळे उलट्या, जुलाब, त्वचाविकाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. पुढील काही दिवस तापमान वाढण्याची शक्यता असून वाढत्या तापमानामुळे डोळ्यांतील बुब्बुल कोरडे होऊन संसर्ग होण्याची शक्यता डॉक्टरांकडून वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे उन्हात जाताना डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक असल्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात आला आहे.

## मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय



**पुणे, दि. २६ :** मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर खराडी पोलिसांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी थायलंडमधील तिघींसह सहा तरुणींची सुटका केली. तरुणींना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी मसाज सेंटरच्या व्यवस्थापकाला अटक करण्यात आली. मालकाविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (पीटा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रुणालयाने बिलासाठी मृतदेह अडविला

**पुणे, दि. २६:** शहरी गरीब योजनेंतर्गत पूना हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुणाचा मृत्यू झाल्यानंतर आठ तासांनी मृतदेह ताब्यात दिल्याचा दावा त्याच्या नातेवाइकांनी केला आहे. याप्रकरणी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे नातेवाइकांनी तक्रार केली आहे. पूना हॉस्पिटलमध्ये महेश पाठक (वय५३ , शुक्रवार पेठ) उपचार घेत होते. त्यांचा एप्रिलला रात्री ५.३०. वाजता मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह ताब्यात घेण्यासाठी नातेवाइकांनी रुग्णालय प्रशासनाकडे विचारणा केली. त्या वेळी त्यांना देयक (बिल) विभागात पाठविण्यात आले. रुग्णावर शहरी गरीब योजनेअंतर्गत उपचार सुरू असल्याने त्यांचा मृतदेह सकाळी .८.३० वाजता नेता येईल, असे देयक विभागातील कर्मचाऱ्याने सांगितले. आत्ता देयक तयार करण्यास कोणी नसते, तुम्ही सकाळी या, असे सागंण्यात आले, असे रुणाचे नातेवाइक व अग्निशामक विभागाचे अधिकारी नीलेश महाजन यांनी आरोग्य विभागाकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.सकाळी ८.२०. वाजता नातेवाइक रुग्णालयात गेले. त्यानंतर८.४५ . वाजता देयक विभागातील कर्मचारी आले. वरिष्ठ अधिकारी येईपर्यंत,४.३० . वाजेपर्यंत थांबावे लागेल, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. नातेवाइकांनी रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकारी आणि मुख्याधिकाऱ्यांना भेटू देण्याची विनंती केली. मात्र, दोन्ही अधिकारी १० वाजता येतात, असे सांगण्यात आले. अखेर सकाळी ४.३०. वाजता मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. याचबरोबर देयक विभागाने ७ हजार रुपयांची परताव्याची रक्कम द्यायची आहे, असेही नातेवाइकांनी सांगितले. त्यामुळे केवळ देयकावर प्रक्रिया करण्यासाठी मृतदेह आठ तास रोखून ठेवण्यात आल्याने रुणालयावर कारवाई करावी, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# महारेराचे थकीत वसुली आदेश तब्बल ६८४.५६ कोटींच्या वसुलीला वेग

### सहा जिल्ह्यांसाठी १२ समर्पित महसूल वसुली अधिकारी नियुक्त

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** महारेराच्या आदेशानुसार तक्रारदाराला व्याजाची, तसेच घराची रक्कम परत न करणाऱ्या विकासकांविरोधात वसुली आदेश (रिकव्हरी वॉरंट) जारी करण्यात आले आहेत. मात्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून थकीत वसुली वेगात होत नसून आजही तब्बल६८४.४८ . कोटी रुपयांची थकीत वसूली आहे. आता मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर आणि पुण्यातील थकीत वसुलीला वेग देण्यात येणार आहे. राज्य सरकारने यासाठी या सहा जिल्ह्यांमध्ये १२ समर्पित महसूल वसुली अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या सहा जिल्ह्यांत ६८४.४८. कोटी रुपयांपैकी ६८४.५६. कोटी रुपये थकीत वसुली आहे. महसूल विभागाने १२ समर्पित महसूल वसुली अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे संबंधित तक्रारदार ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.आतापर्यंत४१२.११ . कोटी रुपयांचे वसूली आदेश जारीमहारेराकडे मोठ्या संख्येने खासगी विकासकांविरोधात तक्रारी दाखल होत आहेत. या तक्रारींनुसार ग्राहकांची फसवणूक झाल्याचे, रेरा कायद्याचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यानंतर तक्रारदाराने मालमत्तेसाठी विकासकाकडे भरलेली रक्कम व्याजासकट परत करण्याचे आदेश महारेराकडून दिले जातात. मात्र या आदेशाचे पालन न करणाऱ्या विकसकांविरोधात महारेराकडून वसूली आदेश (रिकव्हरी वॉरंट) जारी करण्यात येतात. त्यानुसार विकासकाची मालमत्ता जप्त करून, त्याचा लिलाव करून त्यातून येणारी निश्चित रक्कम संबंधित तक्रारदाराला देण्यात येते. ही प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. त्यानुसार आतापर्यंत महारेराकडून एकूण ४१२.११. कोटी रुपयांचे वसूली आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ२२२.१३ . कोटी रुपयांची वसुली झाली असून ग्राहकांना त्यांचा परतावा करण्यात आला आहे. पण आजही तब्बल ६८४.४८. कोटी रुपयांची थकीत वसुली असून मोठ्या संख्येने ग्राहक भरपाईची, परताव्याची वाट पाहत आहेत.


## पाचवी, आठवीचा शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल जाहीर



■ महासागर प्रतिनिधी,

**पुणे, दि. २६ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. त्यानुसार पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ३३.४०. टक्के, तर आठवीचा निकाल १४.३०. टक्के लागला आहे.राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी अंतरिम निकालाबाबत माहिती दिली. परीक्षा परिषदेमार्फत पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्तीची परीक्षा ४ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली होती. राज्यभरातून पाचवीच्या५ लाख४६ ४६४६ हजार ८७४ विद्यार्थ्यांनी, तर आठवीच्या ३ लाख६५ ६५ हजार ८५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. अंतरिम निकालात काही आक्षेप, दुरुस्ती असल्यास गुणपडताळणी करण्यासाठी विद्यार्थ्यांना ४ मेपर्यंत संबंधित शाळेच्या लॉगिनमध्ये ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव यात दुरुस्तीसाठी४ मेपर्यंत संबंधित शाळेच्या लॉगिनमध्ये ऑनलाइन अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अर्ज ऑनलाइनव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीने स्वीकारण्यात येणार नाही, तसेच मुदतीनंतरच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

# तूर्तास वाहतुकीसाठी खुला...



■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील प्रभादेवी पूल शुक्रवारी रात्री ४ वाजल्यापासून वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार होता. मात्र शिवडी वरळी उन्नत रस्ता प्रकल्पात बाधित होणाऱ्या रहिवाशांनी शुक्रवारी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि पूल वाहतुकीसाठी बंद करण्यास कडाडून विरोध केला. आधी पुनर्वसन, मगच पूल बंद, अशी आक्रमक भूमिका प्रकल्पबाधितांनी घेतली. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) शुक्रवारी रात्री ४ वाजता पूल बंद करता आला नाही.

नेहमीप्रमाणे आजही या पुल–ावरून वाहतूक सुरू आहे. ही वाहतूक सोमवारपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.एमएमआरडीएचे अधिकारी आणि प्रकल्पबाधितांची सोमवारी बैठक होणार आहे. या बैठकीत एमएमआरडीए तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार आहे. या बैठकीनंतरच पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात येण्याची शक्यता आहे . एमएमआरडीएचे अधिकारी आणि प्रकल्पबाधितांची सोमवारी बैठक होणार आहे. या बैठकीत एमएमआरडीए तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार आहे. या बैठकीनंतरच पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात येण्याची शक्यता आहे. आंदोलनामुळे पूल सुरूचअटल सेतूला जोडणाऱ्या शिवडी वरळी उन्नत रस्ता प्रकल्पाअंतर्गत दूरवस्था झालेला १२५ वर्षे जुना प्रभादेवी पूल एमएमआरडीए पाडणार आहे. त्याजागी नवीन द्विस्तरीय पूल (डबलडेकर ब्रीज) बांधण्यात येणार आहे. मुंबई वाहतूक पोलिसांनी एमएमआरडीएला हा पूल वाहतुकीसाठी बंद करून त्याचे पाडकाम करण्यास, तसेच नवीन पुलाच्या उभारणीसाठी २० महिन्यांकरीता ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

ना हरकत प्रमाणपत्राप्रमाणे शुक्रवार, २५ एप्रिल रात्री ४ वाजता पूल वाहतुकीसाठी बंद होणार होता. त्यानुसार रस्ता रोधक (बॅरिगेट्स), पर्यायी वाहतुकीसंबंधीची माहिती देणारे फलक लावण्याची तयारी सुरू असतानाच शुक्रवारी प्रभादेवीतील स्थानिक रहिवासी आणि उन्नत रस्ता प्रकल्पातील बाधित अचानक रस्त्यावर उतरले. त्यांनी एमएमआरडीए विरोधात घोषणाबाजी सुरू केली, पूल बंद करण्यास कडाडून विरोध केला. मध्यरात्री उशिरापर्यंत हा गोंधळ सुरू होता.

# आई आणि मुलींच्या मृत्यूला गॅस एजन्सी व प्रशासन जबाबदार

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** मानखुर्द येथील मंडाळा परिसरातील जनता नगरात सोमवारी लागलेल्या भीषण आगीत आईसह मुलीचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेला एलपीजी गॅस वितरण संस्था (एजन्सी), तसेच महानगरपालिका प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप गोवंडी सिटिझन्स वेल्फेअर फोरमने शुक्रवारी केला. गॅस एजन्सीचा निष्काळजीपणा व संबंधित महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाच्या यंत्रणेतील त्रुटींमुळे दोन जीव गेल्याचा दावा संस्थेने केला आहे. याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाकडे तक्रार करण्यात आली असून गॅस वितरक संस्थेवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी गोवंडी सिटिझन्स वेल्फेअर फोरमने केली आहे.मंडाळा येथील जनता नगरातील हनुमान मंदिरानजीक २१ एप्रिल रोजी रात्री८.३० . च्या सुमारास भीषण आग लागली. शहाबाज खान यांच्या घरातील स्वयंपाकाच्या सिलेंडरचा स्फोट झाला होता. आगीचा भडका उडाल्यामुळे फरान खान (३०), शरिफा (१५) आणि खुशी (६) या घरातच अडकल्या. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आणि फरान, शरिफा, खुशीला नजीकच्या शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच शरीफाचा मृत्यू झाला. त्यांनतर उपचारादरम्यान फरान खान यांचाही मृत्यू झाला. खुशी गंभीर जखमी असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आग लागलेले घर झोपडपट्टी परिसरात असून त्या ठिकाणी दाट लोकवस्ती आहे. यापूर्वीही अनेकदा स्थानिक रहिवाशांनी गॅस गळतीबाबत तक्रार केली होती. मात्र, संबंधित यंत्रणेने तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप गोवंडी सिटिझन्स वेल्फेअर फोरमने केला आहे. चिंचोळ्या गल्लया, खड्डे यामुळे अग्निशमन यंत्रणेला दुर्घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाला, असेही त्यांनी म्हटले आहे . गोवंडी सिटिझन्स वेल्फेअर फोरमने पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांच्याकडे तक्रार केली असून विविध मागण्या केल्या आहेत. पीडितांच्या कुटुंबांना आपत्ती व मानवाधिकार धोरणानुसार तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, गॅस वितरक संस्थेवर सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करावी आणि गॅस वितरक संस्थेला काळ्या यादीत टाकावे, मुंबईतील झोपडपट्टी वस्तींसाठी, विशेषतः गॅस गळती, ज्वलनशील वस्तूंची साठवण आणि अग्निशमन सुविधांच्या अभावावर लक्ष केंद्रित करणारे अग्निसुरक्षा परीक्षण तात्काळ करावे, आग प्रतिबंधासाठी आवश्यक अशा पायाभूत सुविधांसह (अग्निशमन वाहनांना प्रवेशयोग्य रस्ते, हायड्रंट्सची उभारणी, बांधकाम बदल) शहरी पुनर्विकासाचे नियोजन करावे आदी मागण्या संस्थेने केल्या आहेत. ही केवळ एक अपघाताची घटना नाही, ही यंत्रणांची उदासीनता, शहरी व्यवस्थेतील अपयश आणि शासनाच्या अपारदर्शकतेचे भयावह उदाहरण आहे, असे गोवंडी सिटिझन्स वेल्फेअर फोरमचे समन्वयक शेख फैयाज आलम यांनी सांगितले.

# पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेणे हाच पर्याय दहशतवादाविरोधात शिवसेनेची (ठाकरे) ठिकठिकाणी स्वाक्षरी मोहीम




■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांची क्रूरपणे हत्या केल्याच्या निषेधार्थ देशभरात संतापाची लाट उसळली आहे. विविध राजकीय पक्ष पाकिस्तानला धडा शिकवण्याची भूमिका मांडत आहेत. या हल्ल्याच्या निषेधार्थ आणि दहशतवादाविरोधात शिवसेनेनेही (ठाकरे) गेल्या तीन दिवसांपासून महाराष्ट्रभर आंदोलन सुरू केले आहे. पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेणे हाच पर्याय असा ठळक आशय असलेल्या फलकावर स्वाक्षरी मोहीम घेऊन त्याबाबत लोकमत गोळा करण्यात येत आहे. या स्वाक्षरी मोहिमेला नागरिकांकडून प्रतिसाद मिळत आहे.जम्मू-काश्मीरमधील पहलगाम परिसरात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या बेछूट गोळीबारात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यात महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. तसेच, आंदोलनेही करण्यात येत आहेत. दहशतवाद्यांविरोधात भारत सरकारनेही कठोर पावले उचलायला सुरुवात केली असून पाकिस्तानवर विविध निर्बंध लादून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. काश्मिरमधील दहशतादी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेनेनेही (ठाकरे) महाराष्ट्रात विविध ठिकाणी आंदोलन सुरू केले आहे. तसेच, पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेणे हाच पर्याय असा ठळक आशय असलेल्या फलकावर स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला मुंबईकरांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्वाक्षरी मोहिमेसाठी रेल्वे स्थानक परिसर, तसेच बाजारांच्या दर्शनी भागात फलक लावण्यात आले आहेत. गरीब कुटुंबात जन्म, मोलकरीण म्हणून केलं काम डान्सच्या जोरावर झाली लाखोंची मालकीण काश्मीर खराब नाही, सरकारची सिक्योरिटी खराब होती; दहशतवादी हल्ल्यात पतीला गमावलेल्या महिलेने सरकारवर केली टीका, बाई वाड्यावर या असं बाबांनी एकाही चित्रपटात म्हटलेलं नाही, गार्गी फुलेंचं भाष्य, म्हणाल्या, त्यांची प्रतिमागेल्या दोन दिवसांत करण्यात आलेल्या आंदोलनातून दहशतवाद्यांना पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानचा निषेध करण्यात आला. जनतेच्या मनात असलेला राग, प्रतिशोध घेण्याची भावना आणि पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग व्हायलाच पाहिजे, ही मागणी ठामपणे मांडण्यात आली. देशावर ओढवलेल्या या दुःखद प्रसंगात आम्ही भारत सरकारसोबत ठाम उभे आहोत. दहशतवादाविरोधात जो काही निर्णय केंद्र सरकार घेईल, त्याला आमचा पाठिंबा आहे. दहशतवाद्यांचा कणा आता मोडलाच पाहिजे, अशा शब्दात आमदार आदित्य ठाकरे यांनी हल्ल्याच्या निषेधार्थ समाजमाध्यावरून राग व्यक्त केला.

## पद्मावती भागात दहशत माजविणाऱ्या गुंडाविरुद्ध एमपीडीए कारवाई




**पुणे, दि. २५ :** पद्मावती भागात दहशत माजविणाऱ्या गुंडाविरुद्ध पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. सराइताला वर्षभरासाठी नागपूर कारागृहात स्थानबद्ध करण्यात येणार आहे.मयूर रंगनाथ आरडे (वय २४, रा. तळजाई वसाहत, पद्मावती) असे कारवाई केलेल्या गुंडाचे नाव आहे. आरडे याच्याविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगणे, दहशत माजविणे, दरोडा घालणे, खुनाचा प्रयत्न करणे, तोडफोड करणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. २०१४ पासून तो गंभीर गुन्हे करत आहे. त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. कारवाई करुन त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नव्हती. आरडे खूनशी असल्याने त्याच्याविरुद्ध नागरिक तक्रार देण्यास घाबरत होते. त्याच्याविरुद्ध एमपीडीए कारवाई करण्याचा प्रस्ताव सहकारनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड यांनी तयार केला होता. या प्रस्तावाला पोलीस आयुक्तांनी नुकतीच मंजूर दिली. २४ एप्रिल रोजी त्याला तळजाई वसाहत भागातून ताब्यात घेण्यात आले. त्याला वर्षभरासाठी नागपूर कारागृहात स्थानबद्ध करण्यात येणार आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक राहुल गौड, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक सुरेखा चव्हाण, सहायक निरीक्षक सागर पाटील, सहायक फौजदार बापू खुटवड, भाऊसाहेब आहेर, विनायक एडके, किरण कांबळे, गोरख ढगे, महेश मंडलिक, सागर सुतकर, बजरंग पवार, अमोल पवार यांनी ही कारवाई केली.

# अंधेरीतील इमारतीला भीषण आग

### महिलेचा मृत्यू; १० दिवसाच्या बाळासह सहाजण जखमी



■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** अंधेरी येथील लोखंडवाला परिसरातील एका इमारतीला शुक्रवारी मध्यरात्री २.४५. च्या सुमाराला भीषण आग लागली. या दुर्घटनेत अभिना संजनवालिया (३४) यांचा मृत्यू झाला, तर अन्य सहाजण जखमी झाले. जखमींमध्ये १० दिवसांच्या बाळासह एका चिमुकल्याचा समावेश आहे. दरम्यान, या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली.लोखंडवाला परिसरातील अशोक कॅडमी लेनमधील आठ मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील सदनिका क्रमांक १०४ मध्ये मध्यरात्री अचानक आग लागली. त्यावेळी घरातील सर्वजण झोपले होते. त्यामुळे आग लागल्याचे कोणाच्या लक्षात आले नाही. क्षणातच आगीने अक्राळविक्राळ रुप धारण केले आणि घरात धुराचे साम्राज्य पसरले. त्यामुळे घरातील सदस्य जागे झाले. तोपर्यंत आग आसपासच्या घरांमध्येही पसरली होती. आग लागल्याचे समजताच रहिवाशांनी आरडाओरडा करीत घराबाहेर पळण्याचा प्रयत्न केला. अनेकजण सुरक्षितरित्या घराबाहेर पडले. मात्र, आग आणि धुरामुळे काही रहिवाशांना बाहेर पडता आले नाही. आगीत अपर्णा गुप्ता (४१), दया गुप्ता (२१), रीहान गुप्ता (३), प्रदुमना (१० दिवस), अभिना संजय वालिया (३४), कार्तिक संजय वालिया (४०), पोलम गुप्ता (४०) आदी अडकले होते. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य सुरू केले. मध्यरात्री ३ वाजून १३ मिनिटांनी आगीला क्रमांक एकची वर्दी देण्यात आली. धुरामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना मदतकार्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, प्रयत्नांची पराकाष्ठा करीत इमारतीत अडकलेल्या रहिवाशांना अग्निशामकांनी बाहेर काढले. धुरात गुदमरल्यामुळे सर्वांना श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यामुळे जखमींना नजीकच्या रुग्णालयांमध्ये नेण्यात आले. काहींना कोकिलाबेन, तर काहींना कूपर आणि ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, अभिना संजय वालिया यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

# गिरणी कामगार ठाम आशिष शेलार यांच्या कार्यालयावर मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** गिरणी कामगारांना मुंबईतच घरे द्यावीत, शेलू आणि वांगणीतील८१ हजार गृहप्रकल्पासंबंधीचा शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी गिरणी कामगार एकजूटीने रविवार, २७ एप्रिल रोजी मोर्चाचे आयोजन केले आहे. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांच्या वांद्रे पश्चिम येथील कार्यालयावर रविवारी सकाळी १० वाजता गिरणी कामगार आणि त्यांचे वारस मोर्चा काढणार आहेत. या मोर्चाच्या अनुषंगाने शुक्रवारी उपमुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरणी कामगार आणि म्हाडा अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत कामगारांना मुंबईत घरे देता येतील का या अनुषंगाने जागेचा शोध घेऊन १० दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश म्हाडाला दिले आहेत. दरम्यान, या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यामुळे गिरणी कामगार एकजूट रविवारच्या मोर्चावर ठाम आहे.१५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करागिरण्यांच्या जमिनीवरील घरांच्या योजनेसाठी पावणेदोन लाख गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांनी म्हाडाकडे अर्ज सादर केले आहेत. यापैकी २५ हजार कामगारांनाच मुंबईत घरे देता येणार असून उर्वरित दीड लाख गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळेच गेल्या वर्षी राज्य सरकारने उर्वरित कामगार-वारसांना मुंबईबाहेर घरे देण्याचा निर्णय घेतला होता. तसेच ८१ हजार घरांचा प्रकल्प हाती घेतला. शेलू आणि वांगणी येथे खासगी विकासकाच्या माध्यमातून ही घरे बांधण्यात येणार आहे. मात्र एकजूटीने या दोन्ही प्रकल्पांना विरोध केला आहे. ही घरे अमान्य केली आहेत. त्यामुळेच शेलू वांगणीतील घरांसाठी १५मार्च २०२४ मध्ये काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्याची मागणी एकजूटीने केली आहे.

# मालमत्ता नावावर केल्याने वाद विकोपाला भावाने केली सख्या बहिणीची हत्या, अंधेरीतील घटना

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २६ :** मालमत्ता स्वत:च्या नावावर केल्यामुळे वर्षीय बहिणीची चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना अंधेरी (प.) येथे घडली. महिलेला जखमी अवस्थेत कूपर रुग्णालयात नेण्यात आले. पण रुग्णालयातील डॉक्टरांनी तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. जुहू पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून वर्षीय आरोपीला अटक केली.अन्वया किरण पैंगणकर (५७) असे मृत महिलेचे नाव आहे. अन्वयाच्या हत्येप्रकरणी जुहू पोलिसांनी तिचा भाऊ आशिष रघुकुल करंदीकर (५४) याला अटक केली. आरोपी आशिष करंदीकर अंधेरी पूर्व येथील लल्लूभाई पार्क रोडवरील रघुकुल सोसायटीमधील खोली क्रमांक ३७ मध्ये राहतात. अन्वया शुक्रवारी आरोपीच्या घरी आल्या होत्या. त्यावेळी आशिष करंदीकर यांच्या बेडरूममधून अन्वया यांचा जोरजोरात ओरडण्याचा आवाज आला. आशिष करंदीकर यांचा मुलगा मृगांक करंदीकर (२१) आवाजाच्या दिशेने गेला. त्यावेळी आशिषने अन्वया यांचे केस हाताने पकडले होत. आशिष दुसऱ्या हातातील चाकू अन्वया यांच्या पोटात मारत होता. त्यावेळी मृगांक जोरात ओरडला. त्याचा आवाज ऐकून घरात असलेली मृगांची बहिण व आजीही तेथे पोहोचली. मृगांकने धाडस दाखवून वडिलांच्या तावडीतून आत्याची सुटका करण्याचा प्रयत्न केला. पण वडिलांनी आत्याचे केस पकडले होते. ते अन्वयाचे केस ओढत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. तू जबरदस्तीने मालमत्ता तुझ्या नावावर करून घेतलीस. तू बहिण म्हणायच्या लायकीची नाहीस, तू मरायला पाहिजेस, असे आशिष बहिणी अन्वयाला बोलत होता. याबाबतची माहिती मुलगा मृगांक याने पोलिसांनी दिली. हल्ल्यात अन्वया गंभीर जखमी झाल्या. त्यांना कूपर रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर पोलिसांनी कुटुंबियांकडून घटनेबाबतची माहिती घेतली. अन्वया यांचा भाचा मृगांक याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आशिष करंदीकर याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०३ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला. जुहू पोलिसांनी आशिष करंदीकर याला बहिणीची हत्या केल्याप्रकरणी अटक केली.

महासागर रविवार २७ एप्रिल २०२५
भंडारा
पान ६

## गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव मंगल कलश रथयात्रा कार्यक्रम २७ व २८ एप्रिल रोजी मोहाडी, तुमसर व भंडारा तालुक्यात

भंडारा : महाराष्ट्र दिनाचे गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ दिनांक २७व २८ एप्रिल २०२५ रोजी मंगल कलश यात्रेच्या निमित्ताने आयोजित या रथयात्रेत महामानवांचे, महापुरुषांचे वास्तव्य लाभलेल्या, महान व्यक्तींच्या कार्याने पावन झालेल्या विदर्भासह महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यांतून वैशिष्ट्यपूर्ण नद्या, संगम आणि ऐतिहासिक स्थळे येथील पवित्र पाणी आणि माती एकत्र आणून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, गौरवशाली परंपरेचे, सामाजिक ऐक्याचे आणि जनतेशी असलेल्या नात्याचे सशक्त दर्शन घडवणे आहे. दरम्यान विदर्भाच्या सर्व जिल्ह्यातून १ मे पर्यंत सर्व मंगल कलश मुंबईला पाठविले जातील म्हणुनच यात्रेच्या स्वागतासाठी व यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निर्धाराने कामाला लागावे. ही यात्रा संघटनबळ, जनसंपर्क आणि सामाजिक सलोखा यांचा संगम ठरून, जनतेत नवचैतन्य निर्माण करेल.

वरील मंगल कलश यात्रेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी, माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवक,

**मंगल कलश यात्रेचे ठिकाण दिनांक २७/०४/२०२५ रोजी**
***१) माता चौंडेश्वरी मंदिर मोहाडी - सकाळी ९.०० वाजता.***
***२) तीर्थक्षेत्र गायमुख देवस्थान - सकाळी ११.०० वाजता.***
***३) चांदपूर देवस्थान - दुपारी १.०० वाजता.***
***४) माडगी येथे (हनुमान मंदिर) - दुपारी ३.०० वाजता.***
***५) डोंगरदेव देवस्थान - सायंकाळी ५.०० वाजता. दिनांक २८/०४/२०२५***
***१) माता पिंगलेश्वरी मंदिर देवस्थान कोरंभी सकाळी ११.०० वाजता.***
***२) गांधी चौक, भंडारा दुपारी २.०० वाजता.***

युवती काँग्रेसचे पदाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सदस्य, नगरसेवक, जि.प./पं. स. क्षेत्र प्रमुख व सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.

# भोजापुर येथील गोसे, पूरग्रस्तांच्या समस्या तात्काळ मार्गी लावा - खा.डॉ.प्रशांत पडोळे

## नॅशनल हायवे रस्ता अडवून केले भोजापुरवासीयांसाठी जनआंदोलन

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. २६ एप्रिल :** भंडारा जिल्ह्यात गोसेबाधित कुटुंबासाठी आज रस्त्यावर उतरून जनआंदोलन केले.

राष्ट्रीय गोसेखुर्द प्रकल्प बाधीत अन्यायग्रस्तांचे रस्ता रोको व धरणे आंदोलन सहभागी झालो.

भोजापुर येथे वारंवार पुराचे पाणी येऊन बऱ्याच कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात त्या-त्या वर्षात नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे.

मौजा-भोजापूर ता.जि.भंडारा येथील कुटुंबांच्या खालील प्रमाणे मागण्या आहेत.

**प्रमुख मागण्याः-**

१) मौजा-भोजापूर येथील सबंधित क्षेत्रात तलाठी द्वारे झालेल्या नृटया वगळून संयुक्त मोजणी व पुनवर्सन त्वरीत कार्यवाही सुरू करावी.

२) मौजा-भोजापूर येथील गोसे प्रकल्प बाधीत अन्यायग्रस्त गट क्र. १९९ व इतर गटांची त्वरीत संयुक्त मोजणी करून भुसंपादण कायदा २०१३ च्या '३०' नुसार पुनवर्सन करण्यात यावे. ३) मौजा-भोजापूर येथील संयुक्त मोजणी व पुनवर्सनाच्या कार्यवाहीस टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्वरीत बडतर्फ करण्यात यावे. भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ प्रशांत पडोळे यांनी तासभर रस्त्यावर उतरून भोजापुर येथील नागरिकांसाठी जनआंदोलन केले. त्या कुटुंबांना न्याय मिळाले पाहिजे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा गाठून जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून निणऱ्य घेण्यास भाग पाडले.

येत्या काही दिवसांत बैठक बोलावली जाईल. असेही जिल्हाधिकारी भंडारा यांनी सांगितले. त्यावर लवकरच मार्ग



काढू, शासनाला तसा प्रस्ताव पाठवू असेही यावेळी सांगितले. पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता.

## संस्कार शिबिराचा आनंदोत्सव २ मे पासून,

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. २६ एप्रिल :** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना विविध कार्यक्रमांद्वारे हसत -खेळत संस्कारित करणारे, मागील ३२ शिबिरांमध्ये शेकडो विधार्थ्यांना प्रेरकल ठरलेले, 'आपण या शिबिरात घडलो'अशी पावती अनेक माजी शिबिरार्थी बोलून जातात असे, संस्कारचे निःशुल्क ३३ वे शिबिर येत्या २ मे २०२५ ते ११ में २०२५ पर्यंत, जकातदार विद्यालयाच्या 'बकुलवाटिका' या रम्य परिसरात सकाळी ६:०० ते ९:०० या वेळेत होत आहे.

शिबिरार्थी आनंदाने सहभाग देतात अशी व जीवनाला प्रेरक ठरणारी कृतिगीते, नाट्य-नृत्य, कथा, खेळ, कवायत, योग्य



मार्गदर्शन, सोबत बिस्किटांसोबत पुस्तकांचा मिळणारा खाऊ, असा दहा दिवसीय 'आनंदोत्सव' या शिबिरात होतो.

कर्तृत्व गाजविलेल्या लोकांचा सहवास ही मिळतो. मातृपितृ पूजनाचा सोहळा, पालकांना आनंदाश्रू गाळायला लावतो. याशिवाय अन्य खूप

उपक्रम असलेल्या, येत्या शिबिराचा लाभ सुट्टीच्या काळात दहा ते पंधरा वर्षीय मुलामुलींनी घ्यावा असे, या शिबिराचे संयोजक प्रा. वामन तुरिले कळवितात.

## मित्र परिवारा तर्फे पानपोई प्रारंभ



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि. २६ एप्रिल :** काही काळापूर्वी वाटसरूंना व कामासाठी साकोली येथे येणाऱ्यांसाठी उन्हाळ्याच्या दिवसात दोन-चार ठिकाणी सार्वजनिक पानपोई असायचा काही पापभिरू दानशूर व्यक्ती व काही सामाजिक संस्था या पानपोई चालवीत असत परंतु अलीकडच्या काळात शुद्धतेची काळजी व बॉटल बंद पाणी संस्कृती अस्तित्वात आल्याने या पानपोई इतिहास जमा झाल्या होत्या . परंतु मागील दहा वर्षापासून पी एम कोटांगले यांनी आपल्या मित्र परिवारासोबत जुन्या बस स्टॉप जवळ सातत्याने दरवर्षी प्याऊ उन्हाळ्यात वाटसरुसाठी सुरू केले. आता सर्वांना विकत घेतलेले पाणी परवडेनासे होते साकोली येथे परिसराच्या गावातून विविध कामासाठी मोठ्या संख्येने लोकं येतात त्यांना विनामूल्य पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून येथील मित्रपरिवार या संस्थेतर्फे नगरपरिषद कार्यालयाजवळ एक सार्वजनिक पाणपोई सुरू करण्यात आली आहे या पाणपोईचे उद्घाटन डी .जी . रंगारी यांच्या हस्ते करण्यात आले मित्र परिवाराचे रवी राऊत, पी.एम. कोटांगले, ललित खराबे व इतर सदस्यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. पानपोई उद्घाटन प्रसंगी राकेश भास्कर, करीम शेख, मुकेश फुलबांधे, हेमलता भोसकर, भाईजान शेख, आनंद निखुरे, मुबारक शेख, आशीश गजबे, फजील खान ,नरेश भुरे व इतर मान्यवर नागरीक उपस्थित होते.बाहेरून आलेल्या व तहानलेल्यांना येथे निशुल्क मिळणाऱ्या शुद्ध पाण्याचा फायदा मिळेल पानपोई चालकांनी पाणी वाटप करताना व पाण्याच्या शुद्धतेकडे लक्ष देण्याची गरजही असल्याचे मित्रमंडळींनी सांगितले.

## आनंद सोनवाने यांची शासकीय सदस्य म्हणून नियुक्ती

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि. २६ एप्रिल :** येथील सामाजिक कार्यकर्ते , भाजपाचे नेते, शहर महामंत्री, आनंद ईश्वरदास सोनवाने यांची साकोली-सेंदुरवाफा महाराष्ट्र शासन औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर शासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री माननीय, मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात ही निवड करण्यात आली आहे.

या नियुक्तीचे श्रेयबद्दल आ परिणय फुके, मा खासदार सुनील मेंढे, जिल्हाध्यक्ष प्रकाश बाळबुद्धे व इतर मित्रमंडळी व कार्यकर्त्यांनी आनंद सोनवाने यांचे अभिनंदन केले आहे.

## साकोली भूमि अभिलेख कार्यालयाच्या संकेतस्थळ व QR कोडचे जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते लोकार्पण



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. २६ एप्रिल :** नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्यासाठी साकोली भूमि अभिलेख कार्यालयाने जिल्हा सूचना केंद्र भंडारा यांच्या सहकार्याने नवीन QRकोड व संकेतस्थळ विकसित केले आहे.

या उपक्रमाचे लोकार्पण जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते ११ एप्रिल २०२५ रोजी, महात्मा ज्योतिबा फुले जयंतीच्या निमित्ताने करण्यात आले.

या नव्या सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या कार्यालयाशी संबंधित तक्रारी नोंदवता येणार आहेत, तसेच प्रलंबित कामांबाबत माहिती मिळविणेही शक्य होणार आहे.

QR कोडच्या माध्यमातून तक्रार दाखल करण्याची सुविधा आणि कार्यालयाच्या संकेतस्थळावर विविध योजना, कार्यपद्धती, शासन निणऱ्य, परिपत्रके व इतर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या प्रसंगी महसूल विभागाचे सर्व उप जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यालयाचे अधिकारी श्री. फुलझेले यांनी QR कोड व संकेतस्थळाच्या उपयोगिता विषद केली. उप अधीक्षक श्री. फुलझेले, NICचे अधिकारी श्री. वासनिक व निवासी उप जिल्हाधिकारी सौ. बेलपात्रे यांचे जिल्हाधिकारी डॉ. कोलते यांनी विशेष अभिनंदन केले.


कार्यक्रमाच्या शेवटी कार्यालय अधीक्षक सौ.रोहिणी पाठराबे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## आज जागतिक हिवताप दिवस - 'चला हिवतापाला संपवू या'

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. एप्रिल :** दरवर्षी २५ एप्रिल रोजी 'जागतिक हिवताप दिन' साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे हिवतापासंदर्भात जनजागृती वाढवणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी जनतेचा सक्रीय सहभाग मिळवणे.

यावर्षीचा घोषवाक्य आहे. 'Malaria Ends With Us: Reinvest, Reimagine, Reignite', ज्याचा मराठी अर्थ आहे. 'चला हिवतापाला संपवू या: पुन्हा योगदान द्या, पुनर्विचार करा, पुन्हा सक्रिय व्हा'.

भारत सरकारने २०२७ पर्यंत देश हिवतापमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत



आहे. भंडारा जिल्ह्यातही यासाठी व्यापक उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिपचंद सोयाम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुवर आणि जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. शंकर दशरथ कैकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधीक्षक, आरोग्य अधिकारी, पर्यवेक्षक, सेविका, अंगणवाडी व आशा कार्यकर्त्या सक्रियपणे काम करत आहेत. हिवतापाचा प्रसार अँनॉफिलीस डासाच्या मादीमुळे होतो. त्याची लक्षणे म्हणजे थंडी वाजून ताप येणे, डोकेदुखी, घाम येणे, कधी कधी उलट्या, तर फॅल्सीफेरम प्रकारात मेंदूवर परिणाम होऊन झटके, बेशुद्ध होणे अशी तीव्र लक्षणे दिसू शकतात. हिवताप प्रतिबंधासाठी नागरिकांनी पाणी साठवण्याची भांडी झाकून ठेवावी, आठवड्यातून एकदा पाणी साठे स्वच्छ करावेत, परिसर स्वच्छ ठेवावा, झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात, गप्पी माशांचा वापर करावा, तसेच घराभोवती पाणी साचू न देता उपाययोजना कराव्यात. भंडारा जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयामार्फत हिवताप व अन्य किटकजन्य आजारांवर मोफत तपासणी व उपचार उपलब्ध आहेत.

हिवतापमुक्त भारतासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे, असे आवाहन भंडारा जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांचे सुयश

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली , दि. २६ एप्रिल :** अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कुल (एकोडी रोड) साकोली येथील इऱ्यत्ता ६ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना 'इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड' अंतिम फेरीतील परिक्षेत सुयश

२०२४-२५ इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये सदर शाळेतील विद्यार्थ्यांनी ईंग्रजी, गणित आणि विज्ञान विषयात प्राविण्य प्राप्त केले. शाळा रॅकींग मधून कु.गायत्री वलथरे, गितिका चांदेवार, ज्ञानदिप बोरकर, हार्दिक कोरे, भौतिक वाघमारे, कु.आराध्या गुप्ता, विधी जिभकाटे, छवी समरीत, प्रणय कोंटागले ह्यांना सुवर्ण पदक प्राप्त झाले. तर कु.द्विती पातोडे, क्रिश्ती मेश्राम, नबीराजा अलान, जित वाधडीया, कु.हितिका चंदवानी, अर्नव भजने, गितिका चांदेवार ह्यांना




रौप्य पदक आणि आदीत्य चंदेल, कु.गौरी येरणे, गौरव अग्रवाल, आल्हाद बडोले, हार्दिक कोरे, जित वाधडीया ह्यांना कांस्य पदक प्राप्त झाले.विद्यार्थ्यानी आपल्या यशाचे श्रेय शाळा व्यवस्थापक जी. एच. ठाकरे, प्राचार्या डॉ.संचिता ब्रम्हचारी, प्रा.अमितोज कौर आईवडील तसेच विषय शिक्षक अतुल नंदेश्वर, मनोजकुमार पेटकुले, शैहबाज खान आणि सर्व शिक्षकवृंद ह्यांना दिले.सर्व शिक्षकांनी त्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चुल्हाड पशु दवाखान्याची अवस्था दयनीय : पशुपालक त्रस्त

## जनावरांच्या लसीकरणाचा प्रश्न ऐरणीवर

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा , दि. २६ एप्रिल :** चुल्हाड जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या चुल्हाड आणि देवरी देव या दोन गावांसाठी मंजूर करण्यात आलेल्या चुल्हाड पशु दवाखान्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पशुपालक आणि त्यांच्या जनावरांच्या आरोग्यासाठी कार्यरत असावा, असा हा दवाखाना प्रत्यक्षात फक्त कागदोपत्री सुरू आहे. ना इमारत आहे, ना पशुधन अधिकारी कार्यरत आहेत. त्यामुळे जनावराच्या लसीकरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जिल्हा परिषद क्षेत्रातील चुल्हाड गावात जनावरांच्या लसीकरण आणि आरोग्य सेवेच्या उद्देशाने हा दवाखाना मंजूर करण्यात आला होता. परंतु, आज या दवाखान्याची फक्त आठवण उरली आहे. यापूर्वी या ठिकाणी डॉ. भैसारे यांच्यासारखे अधिकारी कार्यरत होते. त्यांच्या बदलीनंतर मात्र हा दवाखाना पूर्णतः अकार्यक्षम झाला आहे. सुरुवातीला ग्रामपंचायतीच्या जुन्या इमारतीत सुरू असलेला दवाखाना इमारत कोसळल्यानंतर ग्रामपंचायतीच्या व्यापारी संकुलातील एका खोलीत हलविण्यात आला, परंतु तेथे फलकसुद्धा लावण्यात आलेला नाही. सध्या तालुक्यात ७ पशु दवाखाने मंजूर असले तरी त्यापैकी ६ ठिकाणी पशुधन अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. हरदोली गावात एकमेव अधिकारी कार्यरत असून उर्वरित ठिकाणी ही पदे भरली गेलेली नाहीत. जिल्हा प्रशासनाकडून अहवाल दिले गेले असले तरी राज्यस्तरीय निर्णय घेतला जात नाही, त्यामुळे परिस्थिती जसच्या तस राहिली आहे. शेकडो जनावरांच्या लसीकरणाचा प्रश्न आज ऐरणीवर आहे. लसीकरणाचे शिबिर या भागात आयोजितच होत नसल्याने पशुपालकांना खाजगी उपचारांचा पर्याय निवडावा लागत आहे, त्यासाठी पशुपालकांना अधिकचा आर्थिक खर्च सहन करावा लागत आहे. जेव्हा शासनाने दवाखाना मंजूर केला आहे, तर त्याचा उपयोग का होत नाही ? असा प्रश्न पशुपालक स्थानिक जनप्रतिनिधींना विचारीत आहेत. प्रशासनाने पशु दवाखान्याच्या अस्तित्वाची आणि कार्यक्षमता तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबवाव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### डॉक्टरांचे स्थानांतरण

एकेकाळी या पशु दवाखान्यात सर्व सुविधा होत्या. दिमतीला पशुधन अधिकारी, पट्टी बंधक आणि परिचर होते. पशुधन अधिकारी डॉ. भैसारे यांनी अधिक सेवा दिली. ते चुल्हाडच्या दवाखान्यासाठी अखेरचे पशुधन अधिकारी ठरले. डॉ. भैसारे यांचे पदोन्नतीवर स्थानांतरण झाले.

'चुल्हाड येथील पशु दवाखाना आता कागदावरच आहे. या गावाला जोडणाऱ्या गावातील जनावरांची काळजी इथल्या जनप्रतिनिधींना व सरकारला नाही. दवाखाना नसल्याने लसीकरण, शिबिरांच्या माध्यमातून पशु पालकांना मार्गदर्शन प्राप्त होत नाहीत. ही समस्या तातडीने सोडविली पाहिजे.'

**चंदा ठाकरे, सरपंच, ग्रामपंचायत चुल्हाड.**

## आतंकवादी कृत्याचा खोकरला येथे तीव्र निषेध



**कश्मिरमधील पहलगामृतकांना भावपूर्ण श्रध्दांजली**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. २६ एप्रिल :** कश्मिरमध्ये गेलेल्या पर्यटकांना धर्म विचारून त्यांची हत्या करण्यात आल्याप्रकरणी ग्रामपंचायत खोकरला येथील पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वा येथे आतंकवाद्यांनी हिंदू पर्यटकांना लक्ष करून त्यांच्यावर गोळीबार केला. यामध्ये २८ हिंदू पर्यटकांचे प्राण गेले. या भ्याड हल्ल्याचा खोकरला येथे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयापुढे २४ रोजी सायंकाळी निषेध सभा घेण्यात आली. प्रसंगी मृत पर्यटकांना श्रध्दांजली अर्पण करून आतंकवाद्यांचा शोध घेवून कठोरातून कठोर शिक्षा देवून सरकारने मृतकांच्या कुटूंबियांना न्याय मिळवून द्यावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी सरपंच वर्षा सार्वे, उपसरपंच तेजस लांजेवार, ग्रामपंचायत सदस्य वर्षा गजभिये, सुषमा बाबरे, सुनील काकड, कमलेश मेंढे, पंकज उके, सुरेश घोडे, गजानन गजभिये, अनिल साखरकर, टिचकुले साहेब, सुमित पवनकर, मुकेश कुरंजेकर, गोलू मोटघरे, राजेश तरारे व ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आज २५ एप्रिल रोजी सकाळी सुध्दा खोकरला येथील संत जगनाडे महाराज चौकात श्रध्दांजली सभा घेवून मृत पर्यटकांप्रती आदरांजली अर्पण करण्यात आली.

RNI No.-MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# उद्धव - राज, अहंकार सोडा, महाराष्ट्राच्या भल्यासाठी एकत्र या!

मी शिवाजीराजे भोसले बोलतोय या चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी पॉडकास्ट वर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुलाखत घेतली. त्यात त्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव ठाकरे यांच्या बरोबर एकत्र येण्याची तयारी दर्शवली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा प्रतिसाद दिला आहे. शिवसेनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रस्तुत लेखकाने लिहिलेला लेख.

----------------





अहंकाराचा वारा न लागो राजसा.. असे संत ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे. माऊलींची माफी मागून त्यात मी थोडासा बदल करु इच्छितो की "अहंकाराचा वारा न लागो 'उद्धव-राज'सा! उद्धव आणि राज, अहंकार सोडा आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी, विकासासाठी एकत्र या.

दोघांच्या सुपीक डोक्यात महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा संपूर्ण आराखडा (रोड मॅप) तयार आहे. तो अंमलात आणण्यासाठी तुम्ही दोघांनी सर्वच मतभेद, गीले शिकवे विसरुन, झाले गेले गंगेला मिळाले, असे समजून राज्यातील तेरा चौदा कोटी नागरीक मग त्यात दीन दलित, आदिवासी, गोरगरीब, महिला, कामगार, श्रमिक मजूर, शेतमजूर, समाजाच्या सर्व घटकांपर्यंत विकासाची गंगा पोहोचविण्यासाठी भगीरथ बनून एकत्रित या.

गतवर्षीच्या पंधराव्या विधानसभेच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील (चंद्रशेखर बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष असले तरी) भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित महायुतीला २८८ जागांपैकी तब्बल २३० जागा मिळाल्या. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (२०), नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस (१६) आणि शरदचंद्र गोविंदराव पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस (१०) अशा एकूण केवळ ४६ जागा मिळून (लोकसभेतील घवघवीत यशावर अक्षरशः पाणी फिरवून) पानीपत झाले.

जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांचे बंड आणि ३० जून २०२२ रोजी भारतीय जनता पक्षाच्या वळचणीला गेलेल्या शिंदेंच्या गळ्यात भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मुख्यमंत्री पदाची माळ घातली. त्यानंतर अजितदादांनी शरद पवार यांच्या बरोबर फारकत घेत शिंदे फडणवीस सरकार मध्ये स्थान पटकावले.

सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही पक्षांच्या संदर्भात अद्यापही निर्णय दिलेला नाही. हा निर्णय देण्यापूर्वीच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे निवृत्त झाले. शरद पवार, उद्धव ठाकरे, कॉंग्रेस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना जबरदस्त फटका बसला आहे. शंभराहून जास्त जागा लढवूनही राज ठाकरे यांना भोपळाही फोडता आलेला नाही.

लोकसभेच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला १३, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला ९, शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला ८ जागा मिळाल्या तर भाजपला ९, शिंदेंच्या शिवसेनेला ७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला केवळ एक जागा मिळाली.

एक लोकसभा मतदारसंघ म्हणजे सहा विधानसभा मतदारसंघ या प्रमाणे कालच्या विधानसभा निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी किमान ५४, शरद पवार यांच्या पक्षाला ४८ आणि कॉंग्रेसला ७८ यायला हव्या होत्या. ढोबळमानाने हा हिशोब केला तर महाविकास आघाडी सहज सत्तेवर यायला हवी होती. परंतु लोकसभेच्या निवडणुकीनंतर शिंदे, फडणवीस, अजित पवार यांच्या सरकारने मतदारांना प्रलोभने दाखविणारे प्रचंड निर्णय घेतले? शासन निर्णयांचा (जीआर) विक्रम केला. मतदार 'लाडके' झाले आणि २८८ पैकी तब्बल २३० जागा जिंकून निर्विवाद सत्ता हस्तगत केली.

पक्षाला विधानसभेच्या एक दशांश जागा ज्या पक्षाला मिळतील त्या पक्षाला विरोधीपक्षनेते पद मिळू शकते. परंतु उद्धव ठाकरे, शरदचंद्र पवार आणि कॉंग्रेस मिळून केवळ ४६ जागा मिळाल्याने या पैकी कोणत्याही एका पक्षाकडे विरोधीपक्षनेते पद येऊ शकणार नाही. अर्थात तिघे मिळून एकत्र येऊन दावा करु शकतात आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला हे विरोधीपक्षनेते पद मिळू शकते. हा झाला निवडणुकीतील निकालावरचा वस्तुस्थिती दर्शक आढावा.

आपला मूळ मुद्दा वेगळाच आहे. तो आहे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी स्थापन केलेल्या शिवसेनेचा आणि मुंबई सह महाराष्ट्रात याच शिवसेनेच्या अस्तित्वाचा. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला भले निवडणूक आयोगाने नांव आणि धनुष्यबाण हे चिन्ह दिले असले आणि पक्षोपपक्षात पर्यटन करुन आलेले अनेक जण त्या पक्षात जाऊन वरची पदे उपभोगत असतील तरी मुंबई महाराष्ट्रातील निष्ठावंतांना मानणारी जनता उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हीच बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना असल्याचे मानते.

ज्यांनी मातोश्रीच्या दरवाजावर कधी पाय ठेवला नाही, ज्यांनी कधी बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद घेतलेले नाहीत, ज्यांनी बाळासाहेब ठाकरे हे शिवाजी महाराजांपेक्षा मोठे आहेत काय? असा सवाल केला आहे ते बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे नेण्याची भाषा करताहेत. इतकेच नव्हे तर ज्यांनी बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्याचे दुस्साहस केले त्यांच्या मांडीला मांडी लावून बसताहेत.

धर्मवीर आनंद दिघे यांना कुणी पाहिले नाही, त्यांचे सान्निध्य, आशीर्वाद, मार्गदर्शन ज्यांना लाभले नाही ते धर्मवीरांचे गोडवे गात आहेत. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केल्यानंतर हेमचंद्र गुप्ते, छगन भुजबळ, नारायण राणे, गणेश नाईक आणि राज ठाकरे हे शिवसेना सोडून गेले? हे अनेक धक्के पचवून बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या पश्चात उद्धव ठाकरे यांनी पक्षाला एका दर्जेदार उंचीवर नेऊन ठेवले. शिवसेनेचा आठ वर्षांपूर्वी सुवर्णमहोत्सव झाला. त्यावेळी मी लिहिले होते की, उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आले, या दोन्ही भावांनी एकत्रितपणे अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला तर मुख्यमंत्री शिवसेनेचा आणि उपमुख्यमंत्री महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा होऊ शकतो. उभा महाराष्ट्र या दोघांची प्रतीक्षा करतोय.



योगेश वसंत त्रिवेदी
९८९२९३५३२१

**पूर्वार्ध**

बाळासाहेब ठाकरे यांनी १९९० च्या विधानसभा निवडणुकीत गिरगांव चौपाटीवर केलेल्या भाषणात "महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरात मध्ये राहतो तो गुजराथी, बंगाल मध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदू" ही हिंदुत्वाची व्याख्या केली होती.

ही व्याख्या मुंबई उच्च न्यायालयात मनोहर जोशी यांच्या निवडणूक खटल्यात माझ्या तोंडून न्या. सॅम वरियावा यांच्या समोर आली. या व्याख्येमुळे ११ डिसेंबर १९९५ रोजी न्या. जे. एस. वर्मा यांनी मनोहर जोशी यांना निर्दोष मुक्त केले. छगन भुजबळ यांच्या हकालपट्टीचे निवेदन बाळासाहेब ठाकरे यांनी मला लिहून घ्यायला सांगून ते सामनामधून सर्व वर्तमानपत्रात द्यायला लावले. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली त्या संपूर्ण कालावधीत मातोश्री येथे वृत्तांकन करण्यासाठी मला सामना मधून पाठविण्यात आले होते. त्यावेळी बाळा नांदगावकर हे सकाळी मातोश्री आणि दुपारी कृष्णकुंज येथे उपस्थित राहून उद्धव आणि राज यांच्यात दुवा म्हणून काम करीत होते.

बाळासाहेब ठाकरे यांच्या दृष्टीने तो अतीशय कठीण काळ होता? उद्धव ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले होते की मोटारीला एकच स्टेअरिंग असते. एक तर ते स्टेअरिंग राजने घ्यावे अथवा मी मोटार चालवावी. एकच स्टेअरिंग दोन जण कसे चालविणार? राज ठाकरे यांनी ही राजकारण आणि कुटुंब यापैकी एकाची निवड करायची झाल्यास मी कुटुंबाची निवड करीन. राजकारणामुळे कुटुंब तुटू देणार नाही. परंतु दुर्दैवाने विचार विमर्श, चर्चा वाटाघाटी नंतर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

काही नतद्रष्टांनी मातोश्री हून कृष्णकुंज वर जाऊन शिवसेना नेस्तनाबूत करण्यासाठी राज ठाकरे यांना साकडे घातले त्यांना शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली आहे, माझे भले मतभेद असतील पण मी शिवसेना नेस्तनाबूत करण्यासाठी बाहेर पडलेलो नाही, असे ठणकावून सांगत त्यांना बाहेरचा रस्ता दाखविला.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मध्ये समेट घडविण्यासाठी मनोहर जोशी आणि संजय राऊत हे दोघे कृष्णकुंजवर गेले. परंतु ती शिष्टाई निष्फळ ठरली तेंव्हा राज समर्थकांनी राऊत यांच्या मोटारीचा चेंदामेंदा केल्याच्या बातम्या आल्या होत्या. एका कार्यकर्त्याने कृष्णकुंज ते मातोश्री अशी पदयात्रा काढून ठाकरे बंधूंना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले पण वेड्यात काढून कशाला वेळ वाया घालवता असा सल्ला देण्यात आला.

२००९ च्या निवडणुकीत राज ठाकरे यांच्या इंजिनाने भाजपा आणि शिवसेनेच्या भल्या भल्या नेत्यांना घरी पाठविले. अपवाद फक्त कल्याणचा ठरला. तिथे दिवंगत खासदार प्रकाश परांजपे यांचे सुपुत्र आनंद परांजपे यांनी मनसेच्या वैशाली दरेकर रिंगणात असतांनाही वसंतराव डावखरे यांना पराभवाची धूळ चारली होती.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे संबंध अतीशय कौटुंबिक आहेत. लीलावती हॉस्पिटलमध्ये उपचार / शस्त्रक्रिया केलेल्या ज्या उद्धव ठाकरे यांना स्वतः मोटार चालवीत राज ठाकरे हे मातोश्रीवर सुखरुपपणे सोडायला जाऊ शकतात त्या उद्धव ठाकरे यांना राज ठाकरे यांचा भ्रमणध्वनी क्रमांक घेण्यासाठी कार्यकर्त्याची गरज भासते किंबहुना राज ठाकरे यांना उद्धव ठाकरे यांच्या समवेत संवाद साधण्यासाठी मध्यस्थाची आवश्यकता वाटते, यावर शेंबडे पोर तरी विश्वास ठेवेल?

मराठीचा मुद्दा आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर फक्त, फक्त आणि फक्त उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचाच अधिकार आहे. शिवसेनेचा भगवा हा निखळ संपूर्ण भगवाच आहे जो श्रीरामाचा, शिवरायांचा, हिंदुत्वाचा आहे. या झेंड्याला हिरवी किनार नाही. १९८७ ची विलेपार्ले येथील विधानसभेची पोटनिवडणूक शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांनी लढवली होती त्यावेळी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेने शिवसेनेला पाठिंबा दिला होता आणि जनता दलाच्या प्राणलाल व्होरा यांना भाजपने पाठिंबा दिला होता.

शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर निवडणूक जिंकली तेंव्हा भाजपचे चाणक्य म्हणवले जाणारे नेते प्रमोद महाजन यांनी शिवसेनाप्रमुख हे हिंदुत्वावर निवडणूक जिंकू शकतात, हे जाणून शिवसेना आणि भाजप यांची युती १९८९ च्या लोकसभा आणि १९९० च्या विधानसभा निवडणुकीत घडवून आणली. विलेपार्ले येथील विधानसभेची पोटनिवडणूक हिंदुत्वाच्या मुद्द्यावर लढविली म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वासाठी सहा वर्षे मताधिकार काढून घेण्यात आला. डॉ. रमेश प्रभू यांना आमदारकीवर पाणी सोडावे लागले. एवढा त्याग शिवसेनाप्रमुख आणि शिवसेनेने केला.

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त झाली तेंव्हा भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुंदर सिंह भंडारी यांना पत्रकारांनी प्रश्न केला की, बाबरी किसने गिरायी ? त्यावर सुंदर सिंह भंडारी म्हणाले, "नहीं वह बीजेपी के नहीं थे, आरएसएस के नहीं थे, बजरंग दल के नहीं थे, व्हीएचपी के नहीं थे".

त्यावर पत्रकारांनी पुन्हा प्रश्न विचारला, की फिर वह कौन थे ? तेंव्हा भंडारी यांनी, "शायद वह शिवसेनाके होंगे", असे सांगत काखा वर केल्या. त्याचवेळी "जर ते शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे", असे ठणकावून सांगितले. हा वाघ दुसरा तिसरा कोणी नसून ते होते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे. १९९२-९३ च्या दंगलीत, बॉम्बस्फोटाच्या वेळी मुंबई महाराष्ट्रातील मराठी माणसाला, समस्त हिंदूंना संरक्षण देण्याचे काम बाळासाहेब ठाकरे यांनी केले. शिवसेनेची कॉंग्रेस होऊ देणार नाही, अशा आशयाचे फलक आणि जाहिराती देऊन लोकांना संभ्रमित करण्याचे काम शिवसेना द्वेष्ट्यांनी, उद्धव द्वेष्ट्यांनी केले,व. परंतु शिवसेनेचा जन्म झाला तेंव्हा ही माणसे कुठे होती?

-----------------

(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत.)

■ ■ ■

## पर्यटकांच्या हत्येनंतर कुठे गायब झाले अतिरेकी?



प्रसिद्ध पर्यटन स्थळ बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटक फोटो काढत होते, व्हिडिओ बनवत होते आणि साहसी उपक्रम करत होते. मग गोळीबार सुरू झाला. गोळीबाराच्या ठिकाणापासून दूर असलेल्या पर्यटकांवर कोणताही परिणाम झाला नाही. थोड्याच वेळात त्यांना हेही समजले की हल्ला झाला आहे. जंगलातून येणाऱ्या दहशतवाद्यांनी गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. १० ते १५ मिनिटांत २६ लोकांचा मृत्यू झाला. मग परत जंगलात गायब झाले. त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही.

एकूण ५ दहशतवादी असल्याचे सांगण्यात येत आहे. यापैकी तीन स्थानिक आणि दोन परदेशी आहेत. दहशतवाद्यांनी हल्ल्यासाठी बैसरन व्हॅली का निवडली आणि ते तिथे कसे पोहोचले? तपासात असे दिसून आले की गोळीबार प्रथम जंगलाच्या बाजूने सुरू झाला. त्यामुळे तिथे उपस्थित असलेले पर्यटक दहशतवाद्यांचे पहिले लक्ष्य बनले. जंगलातून जाणारा हा मार्ग पर्वतांमधून त्राल आणि किश्तवाडला जोडतो. हे दोन्ही जिल्हे दहशतवादाचे गड राहिले आहेत. दहशतवादी त्रालच्या जंगलातून आले होते. पहलगाम ते त्राल हे रस्त्याने जाणारे अंतर सुमारे 55 किमी आहे, परंतु जंगलाच्या मार्गाने हे अंतर सुमारे २० किमीपर्यंत कमी होते. याचा फायदा दहशतवाद्यांनी घेतला.

सध्या पहलगामकडे जाणारे मार्ग रिकामे आहेत. कुठेही पर्यटक नाहीत. बाजारपेठेतील दुकाने, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स सर्व बंद आहेत. गुप्तचर यंत्रणांमधील सूत्रांकडून असे दिसून आले आहे की दहशतवाद्यांना स्थानिक पाठिंबा मिळाला होता. त्याशिवाय इतका मोठा हल्ला होऊ शकला नसता. अनंतनाग पोलिस आणि तपास यंत्रणांनी आतापर्यंत २०० हून अधिक लोकांची चौकशी केली आहे. यामध्ये पर्यटकांना दरीत घेऊन जाणारे मार्गदर्शक, घोडेस्वार, चहा-मॅगी विक्रेते, उपक्रम आयोजक आणि दुकानदार यांचा समावेश आहे. त्या सर्वांना सांगण्यात आले आहे की चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांनी माध्यमांशी बोलू नये.

काही दुकानदार सांगतात, 'पहलगाममध्ये एप्रिल ते नोव्हेंबर हा हंगाम मोठा असतो.' हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे, त्यामुळे दुकानांचे भाडे खूप जास्त आहे. येथे ३०० हून अधिक दुकाने आहेत. सर्व बंद आहेत. बैसरन व्हॅलीमध्ये अन्नपदार्थ विकणारे सुमारे २०० लोक, घोडे मालक, दुचाकी मालक काम करतात. हल्ल्यानंतर सर्वजण घरी गेले. हल्ल्याचा व्हिडिओ बनवणाऱ्या आणि पर्यटकाला मदत करणाऱ्यांचीही गुप्तचर युनिटचे अधिकारी चौकशी करत आहेत.

हल्ल्याच्या वेळेचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता ज्यामध्ये एक काश्मिरी माणूस खांद्यावर मुलाला घेऊन पळून जाताना दिसत होता. हा पहलगामचा सज्जाद अहमद भट आहे. सज्जाद एक टुरिस्ट गाईड आहे. तो शालदेखील विकतो. तो सांगतो, हल्ला झाला तेव्हा मी घरी होतो. बैसरन खोऱ्यात हल्ला झाल्याचे कळले. अनेक लोक जखमी झाले होते.

मी लगेच तिथे पोहोचलो.' लोक तिकडे धावत होते. ते घाबरले होते. पाणी मागत होते. मी त्यांना प्यायला पाणी दिले. जखमींना खाली उतरवण्यासाठी आमच्याकडे कोणतेही साधन नव्हते. म्हणून आम्ही त्यांना आमच्या खांद्यावर ठेवले आणि खाली धावलो. १०-१५ लोकांना घोड्यांवर बसवून रुग्णालयात नेण्यात आले. मग कोणीतरी माझा व्हिडिओ बनवला आणि तो व्हायरल झाला. लोकांना वाटतं की जखमींना खांद्यावर घेऊन जाणारा मी एकटाच नव्हे, बरेच लोक होते. मी मुलाला आणि इतर काही लोकांना घेऊन गेलो.

सूत्रांचे म्हणणे आहे की, 'बैसरन खोऱ्यात सुरक्षा नाही हे दहशतवाद्यांना माहिती होते. जवळपास सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. दरीपासून सुमारे ५ किमी अंतरावर टेकडीच्या खाली सीआरपीएफची एक छावणी आहे. त्यांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी अर्धा तास लागू शकतो. बैसरन व्हॅली फक्त पायी किंवा घोडे आणि एटीव्ही बाईकने पोहोचता येते. त्यामुळे, सुरक्षा दल पोहोचण्यापूर्वीच दहशतवादी जंगलातून पळून गेले.

दहशतवाद्यांसाठी लपण्यासाठी सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणजे त्रालचे जंगल. मला वाटतं दहशतवादी त्याच मार्गाने बैसरन खोऱ्यात आले असावेत. 'जम्मू आणि काश्मीरमध्ये आजपर्यंत कोणत्याही पर्यटकावर हल्ला झालेला नाही. पहिल्यांदाच दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले आहे.

काहींच्या मते आयएसआयच्या पाठिंब्याने, दहशतवादी संघटना काश्मीरमधील लोकांमध्ये भीती निर्माण करू इच्छितात. स्थानिक पाठिंब्याशिवाय हा हल्ला शक्य नाही. शेवटी सत्य हेच आहे की दहशतवाद्यांनी 27 जीव घेतले आणि पळून गेले. देशभरात संतापाची लाट आहे, आता भारत सरकारने कारवाई करायची आहे.

■ ■ ■

## TDS टॅक्स तथा TDS रिटर्न भरण्याच्या शेवटच्या तारखा कोणत्या?

### सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

गेल्या 2 आठवड्यापासून आपण ळऊ व ळउर बद्दल बघत आहोत. यात आपण टी.डी.एस. व टी.सी.एस. म्हणजे नेमके काय असते हे समजले. आता आपण यापुढील माहिती सविस्तरपणेबघणार आहोत जी नेहमीच्या सोप्या प्रश्नोत्तर रुपात राहील.

**प्रश्न :** Deductor ने TDS कपात केले म्हणजे त्याचे काम झाले का ? तसेच TCS collector ने TCS जमा केले की त्यांचे काम पूर्ण होते का?

■ नाही. TDS ज्याने कपात केले आहे त्याला ते कपात केलेले TDS सरकारला जमा करावे लागते तसेच TDS रिटर्न भरून सरकारला कळवावे लागते की त्याने कोणाकोणाचा किती TDS कपात केला आहे व कोणत्या कलमाखाली TDS कपात केला आहे. याच प्रकारे TCS चे सुद्धा जमा केलेले पैसे TCS कलेक्टरला सरकारला देय तारखेच्या आत जमा करावे लागतात.

नुसते सरकारी खात्यात पैसे जमा केले म्हणजे पूर्ण काम झाले असे नसते. त्यांना याचे डिटेल रिटर्न सुद्धा दाखल करावे लागते. या रिटर्न मुळे संबंधित अधिकाऱ्यांना ठळकपणे समजते की कोणाचे पैसे किती जमा केले गेले व किती सरकारी खात्यात जमा झाले. जर त्यांना यात तफावत आहे असे निदर्शनास आले तर संबंधित अधिकारी संबंधित करदात्यावर कारवाही सुद्धा करतात.

**प्रश्न :** जर TDS Deductor किंवा TCS Collector ने हे पैसे सरकारला न भरता स्वतः वापरले तर काय होईल ?

■ TDS deductor किंवा TCS collector ने जमा केलेले पैसे हे त्याचे स्वतःचेपैसे नाहीत. हे त्यांनी देय तारखेच्या आत सरकारला भरणे आपेक्षित आहे. जरत्यांनी यात कोणतीही दिरंगाई केली तर त्यांना व्याज द्यावे लागते तसेच पेनाल्टी ही भरावी लागु शकते.

**प्रश्न :** TDS Deductor आणि TCS Collector हे एका प्रकारे सरकारचे काम करत आहे. यात TDS Deductors आणि TDS Collectors यांना काय मिळते?

■ TDSDeductor आणि TCS Collector यांच्या भरलेल्या रिटर्न मुळे सरकारला खुप माहिती मिळते. जे लोक पैसे कमवत आहे परंतु टॅक्स भरत नाही अशा लोकांना शोधण्यात यांची माहिती मोलाची ठरते.

परंतु जरी यांची माहिती एवढी मोलाची असते तरी यांना सरकार कडून काही मिळत नाही. याउलट जर ही माहिती भरण्यात काहीही चुकले किंवा काही दिरंगाई झाली तर सरकारला व्याज व पेनाल्टी ही भरावी लागते.

**प्रश्न :** TDS चे कपात केलेले पैसे व TDS रिटर्न भरण्याच्या तारखा कोणत्या?

■ या तारखा खालील चार्टवरून स्पष्ट होऊ शकतात.

| कालावधी | कपात भरण्याचा महिना | TDS चे कपात केलेले पैसे भरण्याची तारीख शेवटची तारीख | रिटर्न भरण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|---|
| पहिली तिमाही (01) | एप्रिल<br>मे<br>जून | 7 मे<br>7 जून<br>7 जुलै | 31 जुलै |
| दुसरी तिमाही (02) | जुलै<br>ऑगस्ट<br>सप्टेंबर | 7 ऑगस्ट<br>7 सप्टेंबर<br>7 ऑक्टोबर | 30 सप्टेंबर |
| तिसरी तिमाही (03) | ऑक्टोबर<br>नोव्हेंबर<br>डिसेंबर | 7 नोव्हेंबर<br>7 डिसेंबर<br>7 जानेवारी | 31 जानेवारी |
| चौथी तिमाही (04) | जानेवारी<br>फेब्रुवारी<br>मार्च | 7 फेब्रुवारी<br>7 मार्च<br>30 एप्रिल | 31 मे |

## दातांना चमकवण्यात टुथपेस्टलाही मागे टाकतील या ५ झाडांचे देठ



दातांच्या चांगल्या स्वच्छतेसाठी दावा करणाऱ्या अनेक टूथपेस्ट तुम्हाला बाजारात मिळतील. त्यात, अनेकदा असे दिसून येते की तज्ञ देखील टूथपेस्टचा वापर कमी करण्याचा सल्ला देतात. पूर्वीच्या काळात लोक दंतमंजन वापरत असत ज्यामुळे त्यांचे दात चमकदार दिसायचे, शिवाय दात आणि हिरड्यांशी संबंधित समस्याही कमी होत असतं.

लोकांना त्यांचे दात आणि हिरड्या निरोगी राहण्यासाठी अनेक उपाय करत असतात. यासाठी प्रत्येक कंपन्यांचे महागडे टूथपेस्टसह अनेक टूथब्रश बाजारात उपलब्ध आहेत. पण जर तुम्हालाही तुमच्या दातांना नैसर्गिक संरक्षण द्यायचे असेल तर औषधी झाडांच्या काठ्यांचे दंतमंजन हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**कडुलिंबाचे दंतमंजन :** आरोग्यदायी आणि दात स्वच्छ करण्याच्या दातुनबद्दल बोललो तर कडुलिंबाची काठी हे नाव प्रथम घेतले जाते, कारण कडुलिंबाच्या झाडाच्या फांद्या बहुतेक दातांच्या स्वच्छतेकरिता म्हणून वापरल्या जातात. कडुलिंबामध्ये अनेक अँटीऑक्सिडंट्स असतात जे दातांना कॅव्हिटीपासून वाचवतात.

**मिस्वाक दंतमंजन :** कदाचित तुम्ही या झाडाचे नाव ऐकले नसेल. मिस्वाक वृक्ष, ज्याचा वापर काही कंपन्या टूथपेस्ट बनवण्यासाठी देखील करतात. हे दातांसाठी एक उत्कृष्ट दंतमंजन असल्याने जे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे.

**बाभूळ दंतमंजन :** तुम्हाला बाजारात अशी अनेक दातांची काळजी घेणारी उत्पादने मिळतील, ज्यात बाभूळ वापरल्याचे सांगितले जाते. बाभूळ झाडाच्या काठीच्या वापराने तुम्ही दंतमंजन बनवून तुम्ही दात चमकदार करू शकता.

**खैरचा दंतमंजन :** खैरच्या लाकडापासून दंतमंजन बनवू शकता. यामुळे तुमचे दात चमकदार होतीलच पण दातांमध्ये कॅविटी निर्माण होण्यासही प्रतिबंध होईल, विशेषतः ज्यांना आधीच कॅविटी आहे किंवा हिरड्या सुजल्या आहेत त्यांच्यासाठी हे फार उपयुक्त आहे.

**ज्येष्ठमधाचे दंतमंजन :** ज्येष्ठमधाचे नाव अनेकदा ऐकले असेल. औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असलेले ज्येष्ठमध सर्दी आणि घशातील खवखव दूर करण्यासाठी देखील प्रभावी आहे. याशिवाय, ज्येष्ठमधाच्या काठीचा वापर दंतमंजन करू शकता. जे केवळ दातांना चमकदार बनवत नाही तर तोंडाची दुर्गंधी देखील दूर करते.

■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### नाही कसं म्हणता?

नक्षली देतात चेतावणी
पाक घालतोय खतपाणी
शासन पाहते दीनवाणी
देशाची होतेय मानहानी ..

शासनाच्या क्षमतेवर
आलीय आता गदा
नक्षल्यांना शिकवा
कायमचा धडा ...

पाकला करा
चारी मुंद्या चित
तरच राहील
देश सुरक्षित!

# ॲमेझॉन इंडिया २०२५ च्या अखेरपर्यंत ८०,००० हून अधिक डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांना मोफत आरोग्य तपासणी सेवा देणार

**नागपूर, २५ एप्रिल :** ॲमेझॉन इंडियाने आज २०२५ च्या अखेरपर्यंत देशभरात वैद्यकीय शिबिरे राबवत ८०,००० हून अधिक डिलिव्हरी सहयोगींना मोफत आरोग्य तपासणी सेवा देण्याच्या योजनांची घोषणा केली. हा उपक्रम याआधीच तामिळनाडू आणि दिल्ली एनसीआर प्रांतांमध्ये चार शिबिरांचे आयोजन करण्यासह सुरू झाला आहे. या उपक्रमामधून डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांचे आरोग्य व सुरक्षिततेप्रती ॲमेझॉनची कटिबद्धता दिसून येते. मार्श अँड केअर इन्शुरन्सद्वारे वैद्यकीय शिबिरे आयोजित केली जातात आणि डोळ्यांची तपासणी, दंत तपासणी, बीएमआय मूल्यांकन व जनरल फिजिशियन सल्लामसलत यांसारख्या आवश्यक आरोग्य सेवा प्रदान करतात. डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदार ॲमेझॉनच्या लास्ट-माइल डिलिव्हरी स्टेशनवर राबवण्यात येणाऱ्या कोणत्याही शिबिरामध्ये सरकारने जारी केलेला ओळखीचा पुरावा सादर करून या सेवांचा लाभ घेऊ शकतात.

ॲमेझॉन इंडियाच्या ॲमेझॉन लॉजिस्टिक्सच्या उपाध्यक्ष डॉ. करूणा शंकर पांडे म्हणाल्या, ''आम्हाला डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांच्या स्वास्थ्याला साह्य करण्यासाठी भारतभरात ही सर्वसमावेशक वैद्यकीय शिबिरे सुरू करण्याचा अभिमान वाटतो. हा उपक्रम ॲमेझॉनच्या, तसेच त्यांच्या डिलिव्हरी सेवा भागीदाराच्या प्रबळ बेनीफिट्स पॅकेजला दृढ करतो, ज्यामध्ये ग्रुप मेडिक्लेम आणि ग्रुप पर्सनल ॲक्सिडण्ट इन्सुरन्सचा समावेश आहे. आमच्या डिलिव्हरी स्टेशन्समध्ये प्रत्यक्ष प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणत आम्ही लास्ट-माइल ऑपरेशन्सचे आधारस्तंभ असलेले ८०,००० डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांना आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत आहोत.''



शिबिरांचा पुढील टप्पा उत्तर भारतातील दिल्ली एनसीआर, गाजियाबाद, गुरूग्राम, नोएडा, जयपूर, लखनौ आणि वाराणसी येथे आधीच सुरू करण्यात आला आहे.

सल्लामसलतीदरम्यान वैद्यकीय प्रोफेशनल्स आरोग्यसंबंधित घटकांचे पुनरावलोकन करतात आणि सहयोगींना आरोग्य व्यवस्थापनाबाबत वैयक्तिकृत सल्ला देतात. उन्हाळ्यादरम्यान उत्तर भारतात तापमान खूपच उष्ण असते, ज्यामुळे शिबिरांमध्ये डॉक्टर्स डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांना हायड्रेटेड राहण्यासोबत उष्माघाताच्या सुरूवातीच्या लक्षणांना ओळखण्याबाबत मार्गदर्शन करतील. अधिक वैद्यकीय लक्ष देण्याची गरज भासल्यास डॉक्टर्स प्रीस्क्रिप्शन्ससह फॉलो-अपबाबत शिफारस करतात, ज्यामुळे डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांना त्यांच्या निवडीनुसार आरोग्यसेवा सुविधांमध्ये अतिरिक्त सल्लामसलत मिळवण्यास मदत होईल. वैद्यकीय शिबिर उपक्रम ॲमेझॉन आणि डिलिव्हरी सेवा भागीदाराच्या बेनीफिट्स प्रोग्रामशी पूरक आहे, ज्यामध्ये डिलिव्हरी सहयोगी आणि डिलिव्हरी भागीदारांसाठी 'आय हॅव्ह स्पेस' (आयएचएस), फ्लेक्स व डीएसपी प्रोग्राम्सअंतर्गत ग्रुप मेडिक्लेम आणि ग्रुप पर्सनल ॲक्सिडण्ट इन्शुरन्स पॉलिसीजचा समावेश आहे.

नुकतेच, ॲमेझॉनने भारतातील आश्रय केंद्रांचे नेटवर्क २०२५ पर्यंत १०० केंद्रांपर्यंत वाढवण्याच्या योजनांची घोषणा केली होती. आश्रय केंद्रे समर्पित आराम कक्ष आहेत, जे ईकॉमर्स व लॉजिस्टिक्स इकोसिस्टममधील डिलिव्हरी सहयोगींना वातानुकूलित आसनव्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, इलेक्ट्रोलाइट्स, मोबाइल चार्जिंग पॉइण्ट्स, वॉशरूम्स, प्रथमोपचार किट्स आणि रिफ्रेशमेंट सुविधा देतात. हा अद्वितीय उपक्रम आहे, जो जास्त गर्दी असलेल्या क्षेत्रांमध्ये डिलिव्हरी सहयोगी आणि लॉजिस्टिक्स भागीदारांना समर्पित आराम केंद्रे देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. पेट्रोल पंप आणि कमर्शियल रिटेल स्पेसेसमध्ये स्थित या केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा आहेत. आश्रय केंद्रे वर्षभर आठवड्यातून सातही दिवस सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत कार्यरत आहेत, जेथे सर्व भेट देणाऱ्या डिलिव्हरी सहयोगींना प्रतिभेट जवळपास 0 मिनिटांपर्यंत मोफत सुविधा मिळतात. कोणत्याही वेळी जवळपास १५ व्यक्तींना सामावून घेण्याची क्षमता असलेली ही केंद्रे सोईस्कर पार्किंग स्पेसेस देखील देतात.

# ओप्पो इंडिया ने लॉन्च केला ए५ प्रो ५जी: दणकट आणि विश्वसनीय कामगिरीसह टिकाऊपणाचा नवीन मापदंड



**मुंबई, २५ एप्रिल :** ओप्पो एे५ प्रो ५जी हा फोन लॉन्च करून ओप्पो इंडिया ने टिकाऊपणाचे आपले वचन पूर्ण केले आहे आणि स्मार्टफोन लवचिकतेमध्ये एक नवीन मापदंड स्थापित केला आहे. एफ सिरीज पासून ए सिरीज पर्यंत आपला लवचिकतेचा वारसा विस्तारित करून स्मार्टफोनच्या टिकाऊपणाची नव्याने व्याख्या करण्याची परंपरा ओप्पोने चालू ठेवली आहे. समस्त ओप्पो फ्लॅगशिप, मध्यम रेंजमधील फोन आणि एे५ प्रो आता या उद्योगातील आघाडीच्या आयपी६९ सर्टिफिकेशनने सुसज्ज आहेत आणि ते एक टिकाऊ साथीदार फॅमिली निर्माण करण्याच्या या ब्रँडच्या वचनबद्धतेची पुष्टी करतात. या वारशाच्या पाठबळावर ओप्पो आपल्या एे५ प्रो ५जी मार्फत टिकाऊपणा सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध करून देत आहे, मोठ्या प्रमाणातील उपभोक्त्यांना अत्यंत दणकटपणा सहजप्राप्य करून देत आहे.

ओप्पो एे५ प्रो ५जी च्या ८जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १७,९९९ रु. तर ८जीबी+२५६जीबी व्हेरियन्टची किंमत १९,९९९ रु. आहे. ओप्पो एे५ प्रो ५जी अमेझॉन, फ्लिपकार्ट, ओप्पो स्टोअर आणि मुख्य रिटेल दुकानात, दोन रंगांच्या पर्यायात उपलब्ध असेल मोका ब्राऊन आणि फेदर ब्लू. ग्राहक एसबीआय, आयडीएफसी फस्ट बँक, बीओबी फायनॅनष्यल, फेडरल बँक आणि डीबीएस च्या क्रेडिट कार्डवर १५०० रु. पर्यंतचे कॅशबॅक* मिळवू शकतात आणि ६ महिन्यांपर्यंतच्या नो-कॉस्ट ईएमआय चा लाभ देखील घेऊ शकतात. इतकेच नाही, तर एक झीरो डाऊन पेमेंट स्कीम देखील उपलब्ध आहे. त्यामुळे दणकटपणा आणि परफॉर्मन्सचा पॉवरहाऊस असलेला हा फोन विकत घेणे खूप सोपे आहे.

या स्मार्टफोनला या उद्योगातील आघाडीचे आयपी६९, आयपी६८ आणि आयपी६६ सर्टिफिकेशन मिळाले आहे, त्यामुळे तो पाणी, धूळ आणि हाय-प्रेशर जेट्स विरुद्ध संपूर्ण संरक्षण देतो. यामध्ये १८ मल्टी-लिक्विड रेझिस्टन्स संरक्षण देखील आहे. त्यामुळे हा फोन खारे पाणी, घाम, कॉफी यांसारख्या विविध दैनंदिन संपर्कात येणाऱ्या द्रव पदार्थांपासून संरक्षण देण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे. अशाप्रकारे हा फोन प्रत्यक्ष जगातील अनपेक्षित परिस्थितीमध्ये आदर्श साथीदार ठरतो. अचानक तुम्ही पावसात अडकलात, धुळीच्या वातावरणात काम करत असलात किंवा अचानक फोन खाली पडला, तर अशा परिस्थितीत हे उपकरण दणकट सिद्ध होते. पाणी आणि धुळीच्या रेझिस्टन्स व्यतिरिक्त, हा मिलिट्री ग्रेडचा शॉक रेझिस्टन्ट एे५ प्रो ५जीअत्यंत कठोर आणि टोकाच्या स्थितीत देखील टिकून राहावा असा बनवण्यात आला आहे. यामध्ये मजबूत डबल-टेंपरिंग ग्लास आहे, जो ड्रॉप रेझिस्टन्स १६०% नी वाढवतो. आणि ओप्पो चे स्वतःचे Sponge Bionic Cushioning अचानक होणारा आघात शोषून घेते. याची एरोस्पेस ग्रेडची एएम०४ ॲल्युमिनियम ॲलॉय फ्रेम मदरबोर्ड सारख्या महत्त्वाच्या भागांचे संरक्षण करून अतिरिक्त टिकाऊपणा प्रदान करते. ओप्पो च्या Splash Touch टेक्नॉलॉजीमुळे यूझर ओल्या किंवा तेलकट हातांनी देखील स्क्रीन सहजपणे वापरू शकतो. त्यामुळे हा फोन दमट वातावरणासाठी आणि स्वयंपाकघरातील वापरासाठी देखील योग्य आहे. अगदी हातमोजे घालून देखील हे उपकरण वापरता येऊ शकते, त्यामुळे सतत फिरत असलेल्या यूझर्ससाठी तो उपयुक्त ठरतो. या उपकरणावर १४ Military Standard (MIL-STD-810H-2022) परिस्थितीच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये पराकोटीचे तापमान, पाऊस, धूळ, खारे धुके आणि शॉक यांचा समावेश आहे. तुम्ही प्रवास-प्रेमी असाल, बाहेर फिरती करणारे व्यावसायिक असाल किंवा एका विश्वसनीय फोनची तुम्हाला कदर असेल, तर ओप्पो एे५ प्रो ५जी हा तुमच्यासाठी योग्य साथीदार आहे.

# खूप शक्तिशाली स्क्रिप्ट क्वचितच मिळते : अनुष्का मर्चंडे



**मुंबई, २५ एप्रिल :** भारतात अनेक छोट्या शहरांमध्ये स्वप्ने पाहणारे लोक आहेत, जे अधिक चांगल्या भविष्यासाठी आशा बाळगून असतात. शिक्षण, क्रीडा आणि कला क्षेत्रात ही स्वप्ने साकार करण्याचे दरवाजे खुले असले तरी मोठ्या शहरांमध्ये जाण्यासोबत काही आव्हानांचाही सामना करावा लागतो. झी टीव्ही अशाच प्रेरणादायक आणि संबंधित कथा दाखवण्यासाठी ओळखली जाते आणि आता आपल्या नवीन शो 'सरु'सह ही वाहिनी अशीच एक कथा घेऊन येत आहे जी एका छोट्या गावातील मुलीच्या पुढे जाण्याच्या प्रवासाची आहे.

सरुचे जग राजस्थानमधील खारस या गावापुरते मर्यादित आहे. ती तिथे आनंदाने राहते, पण तिथे उच्च शिक्षणाची संधी नाही. त्यामुळे तिला आपल्या ओळखीच्या जगाबाहेर पडून शहरात जावे लागते. मात्र तिच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे तिच्या आईला मनवणे, कारण तिच्या आईचा तिला शहरात पाठवण्याला विरोध आहे.

मुख्य भूमिकेत मोहक मटकर झळकत असून तिच्यासोबत या मालिकेत प्रतिभावान अनुष्का मर्चंडे 'अनिका'च्या भूमिकेत सरुच्या जगात प्रवेश करत आहे. अनिका ही एक श्रीमंत, स्टायलिश, अहंकारी आणि स्वार्थी स्वभावाची मुलगी आहे, जी कथेत एक वेगळाच ट्विस्ट घेऊन येते. अनिका कायम सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असते आणि तिला सरु अजिबात आवडत नाही. सरुला खाली खेचण्यासाठी ती काहीही करायला मागेपुढे पाहत नाही. तिची उपस्थिती संघर्ष आणि अनपेक्षित घटना घडवणार आहे, आणि ती एक शक्तिशाली प्रतिस्पर्धी ठरेल.

अनुष्का मर्चंडे आपल्या भूमिकेबद्दल उत्साह व्यक्त करत म्हणाली, झी टीव्हीच्या आगामी मालिका 'सरु'चा भाग होणे माझ्यासाठी खूपच रोमांचक आहे आणि त्यासाठी मी खूप आभारी आहे. या शोच्या पटकथेने मला लगेचच आकृष्ट केले कारण ही कथा अशा तरुण मुलींची आहे, ज्या अधिक चांगल्या भविष्यासाठी विशेषतः शिक्षणाच्या माध्यमातून स्वप्ने पाहतात. अशा स्क्रिप्ट्स फारच दुर्मिळ आणि शक्तिशाली असतात. माझी भूमिका, अनिका, ही खूप बोल्ड, इमेज-कॉन्शस, भावनात्मकदृष्ट्या चढ-उतार अनुभवणारी आणि नेहमी सर्वोच्च स्थानी राहण्याच्या गरजेतून प्रेरित आहे. ती सरुच्या प्रवासात अडथळे आणते आणि कथेत अनपेक्षित वळणे घेऊन येते, ज्यामुळे ती एक महत्त्वाचा भाग बनते.

ती पुढे म्हणाली, या भूमिकेमुळे मला स्वतःच्या सीमा लांघण्याची संधी मिळाली आहे, त्यामुळे मी खूपच उत्साहित आहे. अनिका मला केवळ भावनिकदृष्ट्या नाही, तर तिच्या गुंतागुंतीमुळे आणि तिच्या व्यक्तिमत्त्वातील बदलांमुळे सतत आव्हान देत राहते. मला पूर्ण विश्वास आहे की 'सरु' प्रेक्षकांच्या ह्रदयाला भिडेल आणि संवाद निर्माण करेल. मला अभिमान आहे की मी एक अशी मालिका करत आहे जो महत्त्वाकांक्षा आणि स्वप्ने पाहण्याच्या धैर्याला पाठिंबा देतो.

सरु आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करत राहील, तसतसे प्रेक्षक पाहतील की अनिका तिच्या मार्गात अडथळे उभे करेल आणि तिच्या विरोधात योजना रचेल. त्यामुळे अनिका ही कथेतील लक्षवेधी पात्र ठरेल. काय अनिका सरुला त्रास देण्यात आणि तिची स्वप्ने मोडण्यात यशस्वी होईल?

# कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी सादर केले

**मुंबई, २५ एप्रिल :** भारतातील दुसरी सर्वात जुनी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी (एएमसी) कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने (स्रोत: क्रिसिल रिपोर्ट) सेबीकडे इनिशियल पब्लिक ऑफरिंगसाठी (आयपीओ) ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे.

कॅनरा बँक आणि ओआरआयएक्स कॉर्पोरेशन युरोप एन.व्ही हे कंपनीचे प्रवर्तक आहेत.

या ऑफरमध्ये प्रत्येकी १० दर्शनी मूल्याच्या ४९,८५४,३५७ इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल (ऑफर फॉर सेल) समाविष्ट आहे, ज्यामध्ये कॅनरा बँकेचे २५,९२४,२६६ इक्विटी शेअर्स आणि ओरिक्स कॉर्पोरेशन युरोप एन.व्ही. (प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर्स) यांच्या २३,९३०,०९१ इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडच्या मूलभूत कार्यक्षेत्रात म्युच्युअल फंडांचे व्यवस्थापन आणि भारतीय इक्विटीजवर गुंतवणूक सल्ला देणे याचा समावेश होतो. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत, १२ इक्विटी योजनांसह २५ योजनांचे व्यवस्थापन करते, यात १० कर्ज योजना आणि तीन हायब्रिड योजनांचा समावेश आहे. यांची तिमाहीतील सरासरी AUM ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत १,०८३.६६ अब्ज आहे. कंपनीकडे एक मल्टी-चॅनेल विक्री आणि वितरण नेटवर्क आहे जे ग्राहकांना उत्पादने आणि सेवा देते. यात थर्ड पार्टी वितरक, तसेच नेटवर्कच्या शाखा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे केलेल्या विक्रीचा समावेश होतो.

३१ मार्च २०२२ ते ३१ मार्च २०२४ दरम्यान कंपनीने ३४.७५% CAGR एवढी वाढ नोंदवली आहे, तर उद्योगातील वाढ १८.८% होती (स्रोत: CRISIL अहवाल). या अहवालानुसार, इक्विटी (इक्विटी-ओरिएंटेड हायब्रिडसह) AUM मध्ये कंपनीचा तिसरा सर्वाधिक वाटा होता आणि ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भारतातील सर्वोच्च १० AMC च्या तुलनेत, इक्विटी-ओरिएंटेड AUM मध्ये कंपनीचा सर्वाधिक वाटा होता. बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई आणि बीएसईसह एकत्रितरित्या स्टॉक एक्स्चेंज) या स्टॉक एक्स्चेंजवर इक्विटी शेअर्स सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, ॲक्सिस कॅपिटल लिमिटेड आणि जेएम फायनान्शियल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत.

# सोनीसबवरील वागले की दुनिया मालिकेत आपल्या मुलीच्या सुरक्षेसाठी राजेशने केलेल्या प्रयत्नांचा विपर्यास होतो



**मुंबई, २६ एप्रिल :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से ही मालिका मध्यमवर्गीय जीवनाचे हृदयस्पर्शी चित्रण करते आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील बदलत्या नातेसंबंधांचा आढावा घेते. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की सखी (चिन्मयी साळवी) खारघर येथे आपल्या मैत्रिणींसोबत स्वतंत्रपणे राहण्यासाठी वागले कुटुंबातून बाहेर पडते. तिच्या या निर्णयामुळे वंदना (परिवा प्रणती) भावुक होते आणि राजेश (सुमित राघवन) ला मात्र आपल्या एकट्या राहणाऱ्या मुलीची चिंता लागून राहते.

आगामी भागांमध्ये राजेशच्या मनात सखीविषयीची काळजी वाढू लागते आणि तो तिच्या सुरक्षेसाठी एक वेगळा मार्ग शोधतो. तो तिच्या फ्लॅटच्या बाहेर गुपचूप कॅमेरा इन्स्टॉल करतो, जेणेकरून दुरून देखील तिच्यावर आपले लक्ष राहील असे त्याला वाटते. त्याला केवळ तिच्या सुरक्षेचीच काळजी आहे, पण एक चोरीचे प्रकरण होते आणि राजेशने बसवून घेतलेला छुपा कॅमेरा प्रकाशात येतो आणि त्यावरून राजेशच्या या कृतीचा विपर्यास केला जातो. सखी दुखावते आणि वडीलांनी आपल्यावर अविश्वास दाखवल्याबद्दल तिला धक्का बसतो. या प्रकरणामुळे घरात वादंग माजतो. अथर्व राजेशला गोपनीयता आणि मर्यादा यावरून प्रश्न विचारतो. अपराधी भावनेने राजेश कोसळून जातो, सखीच्या लहानपणीच्या आठवणी त्याच्या मनात दाटून येतात आणि त्या दोघांचे तेव्हाचे लोभस नाते त्याला आठवते.

राजेशने ही कृती प्रेमापोटी आणि काळजीपोटी केल्याचे सखीला समजेल का? की या घटनेमुळे त्या दोघांमधील दरी वाढत जाईल?

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, एक पिता म्हणून हे दृश्य माझ्या मनाला भिडले. वरवर पाहता राजेशची कृती वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करणारी वाटू शकते. पण भीती आणि प्रेमापोटी त्याने हे केले आहे. प्रत्येक माता-पित्याच्या मनात अशीच भावना असते. कधीकधी आपल्या मुलांचे रक्षण करण्याच्या नादात आपण हे विसरून जातो की, ते देखील मोठे होत आहेत. त्यांनाही तेवढे स्वातंत्र्य हवे आहे, धडपडण्याची आणि त्यातून पुन्हा सवरण्याची संधी हवी आहे. वागले की दुनिया मालिकेची ही खुबी आहे की, त्यात कधीच एकतर्फी चित्रण नसते. दोन्ही बाजू दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मुलांचे रक्षण करण्याची माता-पित्याची धडपड आणि मुलांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य आणि विश्वास. या एपिसोडच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाला लागू होणारे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात- युवा पिढी आपल्या माता-पित्याला वाटणारी काळजी समजून घेऊ शकतील का? आणि आपण, माता-पिता मुलांवर विश्वास ठेवून त्यांना स्वतंत्रपणे धडपडण्याची, सावरण्याची संधी देऊन दुरूनच त्यांना आधार देण्याचे जमवू शकणार का? मला वाटते, प्रत्येक कुटुंबात हा प्रवास चालत असतो. दोन पिढ्यांना मध्य गाठता येणे शेवटी महत्त्वाचे असते.

# फुले हा चित्रपट म्हणजे एका युगपुरुषाच्या आणि परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणारा दस्ताऐवज



महात्मा जोतीराव फुले यांच्या बाबतीत सन १९२४ ते १९२७ दरम्यान पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी गावा गावांत फिरुन माहिती संकलित केली. त्याच्याच आधारे आचार्य प्र.के. अत्रे यांनी ३० जानेवारी १९५४ रोजी म. फुलेंवर बोलपट प्रदर्शित केला. त्याच्या प्रदर्शनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. त्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता.

त्यानंतर तब्बल ७० वर्षानंतर समता फिल्मस् आणि अमिता फिल्मस् प्रोडक्शन प्रा.लि. च्या वतीने सत्यशोधक नावाचा मराठी चित्रपट श्री. निलेश रावसाहेब जळमकर यांनी दिग्दर्शित केला.

आता २५ एप्रिल २०२५ रोजी झी स्टुडिओज प्रस्तूत डांसिंग शिवा फिल्मस् आणि किस्समेन प्रोडक्शन्स फिल्म निर्मित व राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत नारायण महादेवन दिग्दर्शित फुले हा हिंदी चित्रपट महाराष्ट्रासह इतरही राज्यात प्रदर्शित करण्यात आला. श्री. प्रणय चौकशी, जगदिश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन, डॉ. राज खवाडे हे निर्माता तर क्रांती शानबाग, कलापी नागदा हे सहनिर्माते आहेत.

सामाजिक क्रांतिचे आद्य प्रणेते महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जाती निर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ ह्या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या ह्या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवन कहाणीला प्रथमच हिंदी भाषेतून रुपेरी पडद्यावर मांडण्यात आले आहे, त्यामुळे आजच्या पिढीला इतिहासाची जाणीव करुन देतानाच नव्या विचारांची दारे उघडणारा हा चित्रपट ठरणारा आहे.

जोतीबांच्या भुमिकेत स्कॅम १९९२ फेम श्री. प्रतीक गांधी यांनी जीव ओतला तर सावित्रीबाईंच्या भुमिकेत अभिनेत्री पत्रलेखा यांनी समर्थपणे साथच दिली नाही, तर काही प्रसंगातून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व समर्थपणे सिध्द केल्याचे दिसते. सावित्रीबाईंची बालपणीची भूमिका राधा धारणे ह्या बाल कलाकार मुलीने साकार करतांना अभियनाची चुणूक दाखविली. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांची दैन्यावस्था घालविण्यासाठी फुलशेतीला प्राधान्य दिले. त्या प्रसंगाने फुले चित्रपटाची सुरुवात करुन प्रेक्षकांना सुखद अनुभूती देण्यात आली. त्यानंतर जोतिबांचा ब्राम्हण मित्र परांजपे च्या लग्नात झालेला अपमान त्यांच्या जिव्हारी लागला, त्यातून क्रांतिकार्य गतीशील होत गेले. शुद्रांना हात लावल्याने पाप लागते. त्यांच्या सावलीचा उच्चवर्णीयांना विटाळ होतो. मुलींना शिकवून तू क्रांती करणार? हा धर्म आणि सत्याचा मार्ग नव्हे, असे मुलगा व सुन यांना सांगतांना गोविंदराव फुले यांच्या मनातील घालमेल प्रभावीपणे दाखविण्यात आली. त्यावर फ्रान्समधील अन्याय-अत्याचार व जुल्म आणि शोषण करणारी राज्यक्रांती ही तेथील मागासवर्गीयांनी हाणून पाडली, हे जोतीरावांचे कणखर उत्तर त्यांच्या पुढील सामाजिक क्रांतीचे सुतोवाच करते.

फुले दाम्पत्यांच्या मुलींच्या शाळेक शिकवित असतांना शिक्षिका सावित्रीबाई यांना केलेली मारहाण, शैक्षणिक साहित्याची केलेली तोडफोड, सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या कार्यापासून परावृत्त व्हावे म्हणून त्यांच्यावर केलेला शेण गोळ्यांचा मारा, जोतिबांच्या खुन करण्यासाठी पाठविलेले भाडोत्री मारेकरी इ. घटनातून सामान्य माणसांना मनात चीड निर्माण केल्यावाचून राहत नाहीत. वस्ताद लहुजी साळवे व मारेकरीचे केलेले मनपरिवर्तन, जोतिबांचा महात्मा म्हणून केलेला गौरव इत्यादि प्रसंग हे मनाला सुखावून जातात. तेव्हा महात्मा फुले यांनी केलेल्या भाषणातून त्यांची समाजासाठी झटण्याची-झिजण्यासाठी त्यांची भूमिका ही प्रेरणा देणारी आहे. विधवा काशिबाई सह इतरही ब्राम्हण विधवांचे बाळंतपण, विधवांचे मूंडन करु नये म्हणुन नाभिकांचा संप, शूद्रांना पाण्यासाठी घरची विहीर खुली करुन देण्याच्या प्रसंगातून फुले दाम्पत्याची कणखर व करारी भुमिका दिसुन येते. समाज व्यवस्थेवर प्रहार करतांना मग आमचा धर्म कोणता? हा प्रश्न विचारणारी चिमुरडी मुक्ता साळवे चा सत्कार करतांना मेजर कँडी यांचे, हा निबंध दलित साहित्याची सुरुवात करणार ठरणार, हे वाक्य बरच काही सांगुन जाते.


महात्मा फुलेंचा अर्धांगवायुमुळे उजवा हात निकामा होवु नये, डाव्या हाताने लेखन करण्यामागील त्यांची जिद्द व चिकाटी दिसुन येते. त्यांचे महानिर्वाण प्रसंगी सावित्रीबाईंनी पती च्या चितेला भडाग्नी दिला. ही क्रांतिकारी घटना म्हणावी लागेल.

सावित्रीबाईंनी प्लेगच्या साथीत अनेक रुग्णांचे जीव वाचविले. पण त्यात त्यांचे देहावसान झाले. ह्या प्रसंगातून अंगावर काटे उभे राहिल्याशिवाय राहत नाही. महात्मा फुलेंचे मित्र उस्मान शेख, फातिमा शेख तसेच पुरोगामी ब्राम्हण मित्रांकडुन मिळालेले सहकार्य हे चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे.

सहकालाकार म्हणून विनय पाठक, जयेश मोरे, आकांक्षा गाडे, विशाल अर्जून, अभिनव राघव, सुरेश विश्वकर्मा, दर्शिल रुपाली सह सर्वच कलाकारांनी फुले चित्रपटाला न्याय देण्याचे केलेले प्रयत्न हे निश्चितच कौतुकास्पद आहे. साथी - साथी, हर जीवन में हम साथी ह्या गीतासोबतच पोवाडा व इतरही गीत हे श्रवणीय आहेत. महात्मा फुलेंच्या मानसिक गुलामगिरी विरुध्द लढ्याचे वास्तववादी चित्रण अनुभवण्यासाठी मिराज सिनेमा येथे जावुन तो प्रत्येकाने बघण्याची गरज आहे. हे सांगणे नलगे!

**समिक्षक**
**प्रा. श्रीकृष्ण बनसोड,**
**किशोर नगर, अमरावती.**
**मो.९७६३४०३७४८**

# शब्दकोडे क्रमांक २०९७



**आडवे शब्द :-**

१) --- -- --- --- नाचरे मोरा नाच 'एक बालगीत
८) लोखंड गुळगुळीत करण्याचे हत्यार
१०) महिला
११) रानरेडा
१२) उगाच
१४) पारद
१७) कालवा
१८) शहर
२०) हिंमत, धैर्य
२२) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
२४) होकारच्या विरुद्ध
२५) वाद्य वाजविणारा
२६) कावळा
२७) समशेर
२९) विमान
३१) स्वाद
३२) गाय
३३) मगज
३५) पद्धत
३६) लहान मूल
३८) गवताचे पान
३९) नशा आणणारा एक पदार्थ
४०अ) अवघड, कडक
४१) मगरींचे अस्तित्व असलेला समुद्र
४४) ताडाच्या झाडीचा रस
४५) सरळ लांब वासा
४७) एक पालेभाजी
४८) सत्ता
५०) पर्वत
५१) युद्धाची गाणी
५५) छोटा पर्वत
५७) भारताचे चलन
५९) दोन मैलाचे अंतर
६०) लक्ष्मीचे एक नाव
६१) रुपेरी मुलामा
६४) कंटाळा आणणारी लाबंलचक बडबड, जाड दोरखंड
६५) वांग्याचा एक लोकप्रिय पदार्थ
६७) मज्ञाव
६८) नेत्रकोणाने पाहणे
६९) धपाटा
७१) शंकर
७२) वाल्मिकीऋषींचे पहिले नाव
७३) ख्रिश्चनांचा प्रमुख सण
७४) देणारा
७५) चांदी
६७) सडेतोड उत्तर
७७) बारा वर्षाचा काळ

**उभे शब्द :-**

१) अनेक प्रकार
२) खंदक
३) एक सुगंधी पांढरे फूल
४) पोपट
५) संकट
६) अरण्य
७) जिवंत असे पर्यंत
८) अक्षरापुढची उभी रेघ
९) नक्कल करणारा
१३) हात
१४) पवित्र
१५) सीतेच्या वडिलांचे नाव
१६) कावळ्याचे ओरडणे
१९) सोन्याचा चागा
२१) कैफी
२२) मोगऱ्याची एक जात
२३) टपाल
२४) बाज विणण्याची सुती पट्टी
२५) व्यर्थ
२८) निकट
३०) शंभर
३१) छोटी लढाई
३४) कापडाला पडलेले भोक बुजविण्याची क्रिया
३७) वरवधूची मिरवणूक
३८) पैंजण
३९) अत्यंत अडचणीच्या वेळेला
४०) घराचा मागचा दरवाजा
४१) अग्नीचा कण
४३) गीत, गाणे
४६) राघव
४९) हिस्सेदार
५२) प्रजा
५३) युवती
५४) विशेष
५६) उणीव, न्यूनता
५८) विनंती, मागणी
५९) पराकाष्ठेचा लाभ
६२) वडील, जन्म देणारा
६३) वरपांगी
६५) खाद्य
६६) नुकसान
६७) साह्य
७०) हालचालीवर ठेवलेली नजर
७१) सदोदित
७२) गंध, मुक्काम
७३) मुलाची वा मुलीची मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. २६ एप्रिल :** निपुण महाराष्ट्र अंतर्गत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाचे आयोजन नवजीवन विद्‌यालय जमनापूर येथे करण्यात आले होते.

या प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साकोली पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी विजय आदमने, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख हटवार, यादवकांत ढवळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सदर प्रशिक्षणाला जिल्हा परिषद आणि खाजगी शाळेतील नियुक्त करण्यात आलेल्या साकोली तालुक्यातील प्रशिक्षणार्थ्यांचा सहभाग होता. या प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक म्हणून केंद्रप्रमुख यादव ढवळे, जिल्हा परिषद वरिष्ठ केंद्रीय प्राथमिक शाळा क्रमांक १ गणेश वॉर्ड साकोली येथील सहाय्यक शिक्षिका शालिनी राऊत, स्मिता पात्रीकर यांनी तज्ञ मार्गदर्शन म्हणून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी केंद्रप्रमुख यादव ढवळे यांनी शासन निणऱ्याची माहिती आणि कृती कार्यक्रम कसा राबवावा याचे विवेचन केले.

शालिनी राऊत यांनी भाषा विषयाचे नियोजन आणि कृती-तून अंमलबजावणी तर स्मिता पात्रीकर यांनी गणित विषय शिकवताना कोणत्या वस्तूंचा वापर करावा यावर प्रशिक्षणार्थी शिक्षकांना सखोल



असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली नगराळे यांनी केले.

# १ मे पासून आपलं गाव स्वच्छ ठेवू !

*** अभियान कालावधीत ओल्या कचऱ्यापासून बनविणार खत * सहभागी होण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांचे आवाहन**

**महासागर जिल्हाप्रतिनिधी**

**भंडारा , दि. २६ एप्रिल :** ग्रामीण जनतेमध्ये स्वच्छते विषयक वर्तणुकीत बदल घडवून आणने, सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, घनकचरा व्यवस्थापनात्त सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करण्याच्या उदेश्याने दि. ०१ मे ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!' अभियान भंडारा जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मिलिंदकुमार साळवे यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन ग्रा. टप्पा २ कार्यक्रमांतर्गत भंडारा जिल्ह्यात भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांचे मार्गदर्शनात तर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) श्री माणिक चव्हाण यांचे नेतृत्वात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची अंमलबजावणी सुरू आहे. गावात निर्माण करण्यात आलेल्या नाडेपच्या माध्यमातून सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून खत निर्मिती करण्याकरीता राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे वतीने 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !' अभियान राबविण्याचे निर्देश दिले आहे. दि. ०१ मे ते दि. ३० सप्टेंबर २०२५ मे ३१, जुन ३०, जुलै ३१ ऑगस्ट ३१, सप्टेंबर १५ असे एकूण १३८ दिवस पर्यंत ही मोहीम राबविण्यात येत आहे. घरगुती व सार्वजनिक स्तरावर वर्गीकरण केलेल्या ओल्या कचऱ्याचे दि. २७ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये संकलन करण्यात येईल. दि. २९ ते ३० एप्रिल दरम्यान या मोहिमेची विविध माध्यमांचा वापर करीत प्रचार प्रसिध्दी होईल. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि. ०१ मे २०२५ ला 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!' या मोहिमेचा शुभारंभ होईल. यावेळी स्थानिकस्तरावर लोकप्रतिनिधी, अधिकारी , कर्मचारी यांची उपस्थिती राहिल. दि. ०१ मे ते दि. १० मे या कालावधीत गावातून संकलीत केलेला ओला कचरा नाडेप मध्ये कचरा भरण्यात येईल. त्यापासून खत निर्मितीनंतर १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नाडेप तयार झालेला खत उपसण्याची प्रक्रिया होईल. सदर अभियाना राबविणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

**अभियानाची पडताळणी :**

१३८ दिवसाच्या 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !' या मोहिमेची पडताळणी जिल्हास्तरावरून प्रकल्प संचालक, जजीमि तथा जिल्हा समन्वयक स्वभामि (ग्रा.), गटविकास अधिकरी, दोन विस्तार अधिकारी, जिल्हा सल्लागार, तालुकास्तरावरील समन्वयक व गट समन्वयक ओल्या कचऱ्यापासून भरलेल्या नाडेप खड्ड्याची पडताळणी करतील.

***प्रचार व प्रसिध्दी, समुदाय सहभाग व श्रमदान :***

जास्तीत जास्त गावामंध्ये ही मोहीम राबविण्यासाठी १ मे पासून सुरू होणाऱ्या याअभियानाची प्रचार प्रसिध्दी स्थानिक वर्तमानपत्र व समाज माध्यमां (सोशल मिडीया) मध्ये करण्यात येईल. तसेच यशोगाथा प्रकाशित करून इतर गावांना प्रेरित करण्यात येणारआहे. अभियाना करीता स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था, बचतगट महिला व शेतकरी गटांचा सहभाग घेऊन गावपातळीवर श्रमदान उपक्रम राबवून जनसहभाग घेतला जाणार आहे.

***अभियानाची सूचना व पुर्व तयारी :***

राज्यस्तरावरून मिळालेल्या निर्देशानुसार, गटविकास अधिकारी, पं.स. स्तरावर ग्राम पंचायत अधिकारी यांची कार्यशाळा, बैठक आयोजित करतील. त्यानंतर ग्राम पंचायत अधिकारी हे ग्रामस्थांना माहिती देतील. तसेच गावात दवंडी दिली जाणार आहे. ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, सोसायटी कार्यालय, तलाठी साज्जा कार्यालयाच्या सूचना फलकावर दि. २५ ते २६ एप्रिल या कालावधीत अभियानाची माहिती प्रसारित करण्यात येईल. या मोहिमेच्या माध्यमातून ग्रामस्तरावर नाडेपद्वारे खत निर्मिती होईल. घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे, ज्यामुळे पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करता येईल. ग्रामपंचायत, बचत गट आणि युवकांचा सक्रिय सहभाग वाढविला जाणार आहे. त्यामुळे भंडारा जिल्ह्यामध्ये ही मोहीम प्रभावीपणे राबवावी असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांनी केले आहे.

# लाखांदूर आधार केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ !

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर , दि. २६ एप्रिल :** महाराष्ट्रातील महिला व बालकल्याण विभागातर्फे सुरू असलेल्या आधार नोंदणीच्या कामावर अलीकडच्या काळात संकट ओढवले आहे. यापूर्वी महानायटी या सरकारी कंपनीमार्फत राज्यभर हे काम सुरळीतपणे सुरू होते. मात्र, अचानकपणे हे काम दुसऱ्या खाजगी कंपनीकडे सोपवण्याचा निणऱ्य सरकारने घेतला असून त्यामुळे अनेक आधार केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे हजारो युवक बेरोजगार झाले आहेत. आपल्या रोजीरोटीवर गदा आलेल्या या तरुणांनी आता आक्रोश सुरू केला आहे.

अनेकांनी लाखो रुपयांचे गुंतवणूक करून आधार नोंदणीची उपकरणे घेतली, कार्यालये सुरू केली आणि कामकाज उभे केले होते. मात्र आता अचानक काम थांबवल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. सध्या महिला व बालकल्याण विभागामार्फत पोषण ट्रॅकर प्रणालीत लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचे मोठे काम सुरू आहे. काम यापूर्वी महाआयटीकडून करण्यात येत होते. या प्रक्रियेमध्ये जिल्हानिहाय हजारो युवक कार्यरत होते. यामुळे ग्रामीण आधार चालक संघटनांनी या निणऱ्याविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली असून, सरकारने या बदलामागचे कारण स्पष्ट करावे, तसेच, नव्याने दिलेल्या कंपनीकडे काम सोपवताना पारदर्शकतेचे कोणते निकष वापरले गेले याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भागातही डिजिटल सुविधा पोहोचत होती. मात्र, आता एका नव्या खाजगी कंपनीला हे काम देण्यात आले असून जुन्या आधार चालकांची सर्व यंत्रणा बाजूला सारण्यात आली आहे.

सरकारने कोणतीही पूर्वसूचना न देता काम थांबवल्यामुळे तरुणांमध्ये प्रचंड नाराजी आहे. 'केवळ काही अधिकाऱ्यांच्या स्वार्थासाठी आणि टक्केवारीच्या राजकारणासाठी हजारो तरुणांना बेरोजगार करणे हा अन्याय आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया लाखांदूर तालुक्यामधील काही चालकांनी दिली. त्यांच्या मते, हे काम महाआयटीकडेच राहिले असते तर सर्व चालकांचे हित जोपासले गेले नसते.

***आमची महीला व बालविकास प्रकल्प यांनी कसलाही विचार विनिमय न करता एका रात्री संपूर्ण राज्यातील आधार संच बंद केले असून या आधार सेंटर साठी लाखो रूपयाची गुंतवणूक करून आधार सेंटर उभारले मात्र शासनाने एका रात्रीतच उध्वस्त केल्याने आम्हा आधार सेंटर चालकांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे त्यामुळे तात्काळ सदर सेंटर सुरू झाले पाहीले.***

***आधार सेंटर चालक***

# जि.प. शाळा किन्ही/ मोखे येथे सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**किन्ही (मोखे) :** जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा किन्ही ( मो. ) येथे इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. या निरोप समारंभाचे अध्यक्षस्थानी शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक एन .आर. पडोळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे पदवीधर शिक्षक बनकर सर, स्मिता पात्रीकर मॅडम , प्रमोद शेंडे , एन.पी.करंजेकर मॅडम, संतोष गडदे सर ,कु. रुपाली रूपनवर मॅडम , उज्वला साखरे , युवा कार्य प्रशिक्षणार्थी रीना बिसेन हे होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम सावित्रीबाई फुले आणि शारदा मातेच्या फोटोचे पूजन करून करण्यात




आले. यानंतर इयत्ता सहावीच्या विद्यार्थीनींनी सुंदर अशा स्वागत गीताने आणि पुष्पगुच्छ देऊन इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

इयत्ता सहावीचे वर्गशिक्षक बनकर यांनी निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

इयत्ता सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त केले. तसेच सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू सुद्धा दिली, ती सर्व शिक्षकांनी शाळेच्या वतीने स्वीकारली. यानंतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आणि यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सुंदर असे संचालन कु .वेदिका साखरे, इयत्ता सहावी आणि आभार प्रदर्शन कु. अनन्या क्षीरसागर इयत्ता सहावी यांनी केले.

या निरोप समारंभाचे उत्कृष्ट नियोजन जि. प. शाळा किन्ही येथील इयत्ता सहावीचे वर्गशिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांनी केले.

# महात्मा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चिचाळ/ बारव्हाचे सुयश

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर , दि. २६ एप्रिल :** महात्मा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चिचाळ/बारव्हा येथील विद्यार्थ्यांनी सत्र २०२४-२५ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे अंतर्गत पूर्व उच्च प्राथमिक (वर्ग ५ वी ) शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ५ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

यामध्ये इयत्ता पाचवीतील आलोक मोरेश्वर नंदेश्वर , कु. लिसा हर्षवर्धन दहिवले , कु. मोनीका लखनलाल दोनाडकर , सुशांत मोहन शहारे , कु. उन्नती मुरलीधर चौधरी या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत उत्तम स्थान मिळविले.

पात्र सर्व विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे महात्मा फुले शिक्षण संस्था चिचाळ/ बारव्हा चे संस्थापक सचिव श्री.बाबुरावजी फुले



साहेब, विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका कु.प्रियंका भागडकर मॅडम,श्री. प्रल्हाद मस्के सर, श्री. अविनाश चहानकर सर, कु. स्नेहा सोनवाणे मॅडम, श्री. संदीप वालदे सर, श्री. शैलेश झिंगरे सर, श्री. कैलास पटले बाबूजी, श्री . दिपक नंदेश्वर,कु. हर्षा लोखंडे, श्री .पंकज खोब्रागडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात जागतिक हिवताप दिन व बक्षीस समारंभ



**सानगडी , दि. २६ एप्रिल :** सानगडी येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्‌यालयात दि. २५ एप्रिल रोजी जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी १०० दिवशीय कार्यक्रमांतर्गत क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र सानगडी येथील आरोग्य सहाय्यक पी.एच. डोंगरे, आरोग्य सहाय्यक एस. एस. जांभुळकर, सुपरवायझर एस.एच. कान्हेकर,आरोग्य सेविका वंदना भस्मे आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्‌यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद वंजारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी हिवताप व त्याची लक्षणे तसेच प्रतिबंधात्मक उपाय याविषयी माहिती दिली.

हिवतापाला सामान्य आजार समजू नये. पावसाळ्याच्या दिवसात घराशेजारी पाणी साचू देऊ नये. घरातील पाण्याचे भांडे दररोज स्वच्छ धुऊन घ्यावी. घराच्या अंगणात सडासारवणासाठी उपयोगात आणलेली बादली नेहमी स्वच्छ ठेवावी. गाई म्हशीच्या शेणाची ढिगारे घराशेजारी ठेवू नये. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी. घराजवळील पाणी नेहमी वाहते ठेवावे. ते साचून राहू नये याची खबरदारी घ्यावी.आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. ताप येणे,डोळे दुखणे, डोके दुखणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित आरोग्य केंद्रात जाऊन रक्ताची तपासणी करून घ्यावी. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत.

शरीरातील पाणी संतुलित राहावे यासाठी भरपूर पाणी प्यावे.अधून मधून लिंबू पाणी प्यावे.सैल असलेले सुती कपडे वापरावे. अनवाणी फिरू नये. विनाकामाने घराबाहेर फिरू नये. अशा प्रकारचे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी केलेले आहे.

यानंतर या कार्यक्रमाचे औचित्य साधून क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत विद्‌यालयातून हिमांशू योगराज मांडवटकर ह्याचा प्रथम क्रमांक, पूर्वी सुनील नेवारे हिचा द्वितीय क्रमांक आणि मानसी राजन रामटेके हिचा तृतीय क्रमांक आला होता. या तिन्हीही यशवंत विद्‌यार्थ्यांना आरोग्य विभागाकडून बक्षीस प्रदान करून गौरवण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शिक्षक माणिकराव खर्डेकर यांनी तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षक अशोक मस्के यांनी पार पाडले.

# मोबाईल टॉवर बनले शोभेच्या बाहुल्या

## ग्रामीण भागात मोबाईल नेटवर्क मिळेना

**मोहाडी :** आजच्या युगात मोबाईलचा वापर करणे ही एक काळाची गरज झाली आहे. त्यामुळे दूरपर्यंत असलेल्या नातेवाईकांशी भ्रमणध्वनी द्वारे सहज संपर्क साधता येते. एकीकडे संपूर्ण देशासह राज्यात डिजिटल इंडियाचे गोडवे गायले जातात. मात्र अजूनही मोहाडी तालुक्यातील काही गावात मोबाईल रेंज साठी ग्रामस्थांना गावाबाहेर , उंच इमारतीवर , झाडांवर , डोंगरावर चढून मोबाईल नेटवर्कचा शोध घ्यावा लागतो. त्यामुळे तालुक्यात उभारण्यात आलेले मोबाईल टावर केवळ शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. मोहाडी तालुक्यातील नवेगाव, धुसाळा, काटी, रोहणा , खैरलांजी , घोरपड , बोन्दरी परिसरात नेहमीच मोबाईल नेटवर्क ची समस्या येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. मोबाईल मध्ये महागडा रिचार्ज भरूनही मोबाईल फोन रेंज मुळे कट होत आहेत . कधी कधी तर मोबाईल मधून कॉलही लागत नाही आणि कॉलही येत नाही. अशी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिक हैराण आहेत. जवळच कांद्री, आंधळगाव, नवेगाव येथे टॉवर उभारण्यात आले आहेत. मात्र टॉवरची रेंज मिळत नाही. परिसरातील गावांचा अंतर जवळपास पाच ते सहा किलोमीटर एवढाच आहे. तरीसुद्धा मोबाईल मध्ये पाहिजे तेवढ्या प्रकारात रेंज मिळत नसल्याने रिचार्ज केल्याचा पैसा वाया जात आहे. आजच्या युगात मोबाईल ही एक प्रत्येक नागरिकांची आवश्यकता बनली आहे. परिणामी ३५० रुपये महिन्याचे खर्च करूनही साधा कॉलही धडाने लागत नसल्याने नागरिक चांगले संतापले आहेत. महत्त्वाच्या कामासाठी संपर्क करावयाचा असल्यास नागरिकांना घरातून बाहेर पडून कॉल लावावे लागते. कधी रेंज पकडते तर कधी रेंज सोडते. त्यामुळे परिसरातील नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत.

**रिचार्जचे पैसे वाया**

परिसरात जास्तीत जास्त जिओ कंपनीच्या सिम कार्ड आहेत. दर महिन्याला मोबाईल धारकांना रिचार्ज करावा लागतो. एखाद्या महिन्यात रिचार्ज न केल्यास मोबाईलवर फोन येणे बंद होते . रिचार्ज करूनही मोबाईल मधून भ्रमणध्वनी करताना नेटवर्कच्या समस्या येत असल्याने नागरिकांचे रिचार्ज चे पैसे वाया जात आहेत. परिणामी टॉवरची रेंज वाढवावी. अन्यथा नवीन टॉवर बसविण्यात यावा अशी मागणी होत आहे.

**'विद्यार्थ्यांना नेटसंबंधी त्रास '**

ग्रामीण भागातही बहुतांश शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना होमवर्क म्हणून मोबाईल वर अभ्यासक्रम पाठवत असतात. पण नेटवर्कच्या समस्या कायम असल्याने विद्यार्थ्यांचे मोबाईल नेट काम करीत नाही. त्यामुळे विद्‌यार्थ्यांना मोबाईलवर आलेला होमवर्क करण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेत निरोप समारंभ

**सानगडी , दि. २६ एप्रिल :** संत नरहरी शिक्षण संस्था साकोली द्वारा संचालित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त पंडित जवाहरलाल नेहरू कॉन्व्हेन्ट व सेमी इंग्रजी प्राथमिक शाळा सानगडी येथे चौथी च्या विद्यार्थ्यांसाठी भावपूर्ण निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती मातेच्या प्रतिमेच्या पूजनानी झाली.कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सुरेश लांजेवार हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विठ्ठल रोकडे, माता पालक संघाच्या उपाध्यक्ष रुपाली बारापात्रे, सखी सावित्री समिती च्या सहसचिव पिंकी रोकडे, सदस्य छत्रपाल वालोदे, सुधाकर उंदिरवाडे, विरेंद्र मेश्राम सर, सदस्य खुसराम किरणापुरे, सदस्य मंदा संग्रामे, सीमा हरणे, वंदना कुंभारे, आशा शहारे, मनिषा कुंभारे, शारदा रुखमोडे, उज्ज्वला ब्राह्मणकर, माता पालक संघाच्या सदस्य जयश्री मेश्राम, कविता हेमने, विष्णू चाचेरे, सारिका हर्षे सदस्य, पालक संघाचे दिलीप रुखमोडे,चित्ररेखा श्रीरंगे सदस्य, मुनेश्वर परशुरामकर हे होते. यावेळी चौथी मधील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेत दिले जाणारे संस्कार, शिस्त व अध्यापन हे वाखाणण्याजोगे आहे व आम्हाला खूप चांगले शिक्षण मिळाले असे सांगितले . तिसरीच्या विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्गापासून आजपर्यंतचा सहवास असाच शेवटपर्यंत राहील हे सांगितले



व भारी अंतःकरणाने निरोप दिला व पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. वेदिका बारापात्रे, लावण्या रुखमोडे, श्रेया मेश्राम, उन्नती लोथे, विशाल कुंभारे, शिवम मोटघरे या विद्‌यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. लावण्या रुखमोडे हिने सांगितले की मी या शाळेत येण्यापूर्वी मला लेझिम खेळता येत नव्हते परंतू या शाळेत आल्यावर मला लेझिम व नृत्य चांगल्या प्रकारे शिकायला मिळाले हे सांगितले, वेदिका बारापात्रे हिने सांगितले की या शाळेतून मला खूप काही शिकायला मिळाले व मी ही शाळा व माझे गुरुजन यांना कधीच विसरू शकणार नाही असे आपल्या मनोगतातून सांगितले.तिसरीमधून पारुल रोकडे, आराध्या सिंधीमेश्राम, कुमुदिनी मेश्राम, संस्कार सलामे, जीवेश शेंडे इत्यादी विद्यार्थांनी आपल्या सोबत चौथी मधील विद्यार्थांनी घालविलेले प्रसंग आपल्या मनोगतातून सांगितले. पालकांमधून उज्वला ब्राह्मणकर, छत्रपाल वालोदे, जयश्री मेश्राम, रुपाली बारापात्रे, सारिका हर्षे, इत्यादीनी शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा चढता आलेख व गुणवत्ता आपल्या मनोगतातून व्यक्त केले व शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या व आम्ही तुमच्या सोबत होतो, आहोत व राहणार अशा आशयाचे आश्वासन दिले. प्रसंगी उज्वला ब्राह्मणकर व रुपाली बारापात्रे व इतर पालक व विद्यार्थी मनोगत व्यक्त करताना मात्र भावूक झाले होते हे विशेष. या प्रसंगी वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमात प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक आलेल्या विद्‌यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन तिसरीची विद्‌यार्थीनी लुकेश्वरी वालोदे हिने केले तर आभार प्रदर्शन वर्ग तिसरीची आराध्या सिंधीमेश्रम हिने मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राजाबाई मेश्राम,चंदा रोकडे,ज्योती कुंभारे, मंजुषा डोंगरवार, भारती रोकडे, मीना गोटेफोडे, सुनीता नंदनवार, कला धकाते व सर्व पालक वर्ग, सर्व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# कनेरी दगडी येथे कृषी संजीवनी मशाल रॅली

**महासागर प्रतिनिधी**

**लाखनी , दि. २६ एप्रिल :** येथून जवळच असलेल्या लाखनी तालुक्यातील कनेरी (दगडी) येथे नानाजी कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा टू योजनेअंतर्गत कृषी संजीवनी मशाल रॅलीचे आयोजन दिनांक २३ एप्रिलला कृषी विभाग, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्राम कृषी विकास समितीच्या माध्यमातून करण्यात आले. मशाल रॅलीची सुरवात ग्रामपंचायत कार्यालयातून झाली. मशाल रॅली काढण्यापूर्वी ग्रामविकास समितीची सभा सरपंच लता शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख मार्गदर्शक कृषी उपविभागीय अधिकारी किशोर पात्रिकार यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.याप्रसंगी कृषी संजीवनी प्रकल्प योजनेच्या संदर्भात माहिती व मशाल रॅलीचा उद्देश विशद करताना कृषी अधिकारी म्हणाले की शेती क्षेत्राला प्रोत्साहन देणे, शेतकरी आणि सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करणे, शासकीय योजनांची माहिती देणे यासाठी ही मशाल रॅली काढण्यात आली.सभेत




आधुनिक शेती पद्धत, नवीन तंत्रज्ञान आणि शेती क्षेत्रातील समस्या यावर देखील यावर चर्चा करण्यात आली.या सभेला मंडळ कृषी अधिकारी विकास झलके, कृषी पर्यवेक्षक विद्या गिऱ्हेपुंजे, कृषी सहायक संदीप धरमसहारे उपस्थित होते.पर्यावरण संरक्षण, उत्पादन वाढ,शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती याबद्दल चर्चा झाली. या मशाल रॅलीला सरपंच लता शेंडे, ग्रामपंचायत सदस्य प्यारेलाल झलके, नरहरी नागलवाडे तसेच कृषी ग्राम विकास समितीचे सर्व सदस्य आणि गावकरी सहभागी झाले होते.

# पाण्याच्या टाकी करिता सिव्हील लाईन येथिल शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी.

## माजी उपाध्यक्ष न.प. भंडारा आशु गोंडाणे यांनी केली मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. २६ एप्रिल :** नगरपरिषद भंडारा येथे नगरोत्थन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु आहे.यामध्ये झोन नं.६ मधील प्रस्तावित पाण्याच्या टाकीची जागा अ्ईंप्रमाणे प्रस्तावित जागेवर कायदेशीर अडचणी निर्माण झाल्यामुळे मागील ६ वर्षापासून झोन नं.६ चे काम बंद स्थितीत आहे.झोन नं.६ मध्ये १३ लाख लिटर क्षमतेची टाकी प्रस्तावित आहे.या झोनमधील काम बंद असल्यामुळे शहरातील मोठा भाग तकिया वार्ड,संत ज्ञानेश्वर वार्ड,रमाबाई आंबेडकर वार्ड,विदर्भ हाउसिंग कॉलोनी,श्रएँ कॉलोनी,जज बंगला परिसर,सिव्हील लाईन,पोलीस कॉलोनी,थ्ध्प कॉलोनी ,शिक्षक कॉलोनी,साईनाथ नगर, सत्कार नगर,अशोका हॉटेल परिसर शहरातील मोठ्या परिसरातील पाणीपुरवठा योजना पाण्याच्या टाकीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे योजना बंद अवस्थेत आहे.सदर क्षेत्रातील नागरिकांना होणारी पाण्याची टंचाई लवकरात लवकर सुटावी याकरिता तरी झेंॲअंतर्गत येणाऱ्या सिव्हील लाईन परिसरातील जागा शासनाकडून नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्याचे निवेदन माजी मंत्री आमदार परिणय फुके यांना देण्यात आले.



ह्याप्रसंगी नगरपरिषदचे माजी उपाध्यक्ष आशु गोंडाणे,रुबीजी चड्ढा,सचिनजी कुंभलकर,प्रशांतजी निम्बोळकर,आशा उके,डीम्मुजी शेख,रोनक उजवणे, शिव अजबले, शैलेश मेश्राम, अर्चना श्रीवास्तव आदि उपस्थित होते.




# घरी कृष्णमूर्ती असल्यास



कृष्ण ही देवता प्रेमाचं प्रतीक मानली जाते. संपर्कात आलेल्या व्यक्तीला आपल्याकडे आकर्षित करून घेण्याची क्षमता कृष्णाकडे होती. घरात असणाऱ्या कृष्णाच्या मूर्तीची विशेष काळजी घ्यावी लागते. इतर देवतांच्या मूर्ती आणि श्रीकृष्णाची मूर्ती यात बराच फरक आहे. कृष्णाच्या मूर्तीसोबत देवघरात काय असायला हवं याविषयी...

* कृष्ण बासरी वाजवत असे. श्रीकृष्णाच्या बासरीची धून ऐकून गायी त्याच्या जवळ येत असत. या बासरीकडे गोपिकाही आकर्षित होत असत. बासरीमुळे लोक एकत्र येतात. एका धाग्यात बांधले जातात. त्यामुळे श्रीकृष्णाच्या मूर्तीसोबत एक बासरी ठेवा. यामुळे घर एकसंध राहण्यास मदत होईल.

* हिंदूंसाठी गाय हा अत्यंत पवित्र प्राणी आहे. गायीच्या शरीरात ३३ कोटी देवीदेवतांचा वास असतो अशी श्रद्धा आहे. म्हणूनच गाय पूजनीय आहे. श्रीकृष्णाला दूध, दही, लोणी असे पदार्थ आवडायचे. म्हणून घरात कृष्णाच्या मूर्तीसवे गाय आणि वासराची मूर्ती ठेवा.

* कृष्णाच्या शिरपेचात मोरपीस खोवलेलं असतं. मोरपीस सौंदर्याचं प्रतीक आहे. मोरपीसामुळे घरात आनंद निर्माण होतो. म्हणूनच देवघरात मोरपीस ठेवता येईल.

* कमळ हे आयुष्याच्या संघर्षाचं प्रतीक आहे. चिखलात उगवूनही कमळावर डाग नसतो. अशा या कमळामुळे घरात स्थैर्य निर्माण होतं. त्यामुळे श्रीकृष्णाच्या मूर्तीजवळ कमळ ठेवता येईल.

* श्रीकृष्णाला खडीसाखर आणि लोणी यांचा नैवेद्य दाखवा. हे दोन्ही पदार्थ त्याला अत्यंत प्रिय आहेत.

* श्रीकृष्ण गळ्याभोवती वैजयंती माळ गुंडाळत असे. म्हणूनच श्रीकृष्णाला प्रसन्न करून घेण्यासाठी घरात वैजयंती माळ ठेवायला हवी.

* कृष्णासोबत राधेची मूर्ती असेल तर विशेष काळजी घ्यायला हवी. राधेच्या मूर्तीवर तुळस वाहू नका. राधेच्या हातावर तुळस ठेवता येईल. यामुळे ती कृष्णाला तुळस अर्पण करू शकेल.

* राधा आणि कृष्णाची मूर्ती घरात आणण्याआधी घराचा कानाकोपरा स्वच्छ करून घ्या. घरासोबतच तुमचं शरीर, मन आणि विचारही निर्मळ असले पाहिजे.

* घरातल्या बाळकृष्णाच्या प्रतिमेची तान्ह्या मुलाप्रमाणे काळजी घ्यावी लागते. त्याला न्हाऊमाखू घालावं लागतं. निजवावं लागतं. त्यामुळे बाळकृष्णाची सेवा करण्यासाठी वेळ असेल तरच मूर्ती घरी आणा.

जाणून घ्या

* बाळकृष्णाला दररोज किंवा एक दिवसाआड आंघोळ घातली पाहिजे. स्वच्छ वस्त्र नेसवली पाहिजे. हे सगळे लाडकोड श्रद्धापूर्वक व्हावेत.

* बाळकृष्णाला वेळोवेळी जेवण भरवा. कृष्णाला खायला खूप आवडतं. तो जेवणाची वाट बघत असतो. त्यामुळे त्याच्या आहाराकडे दुर्लक्ष करू नका.

* आंघोळ केल्यानंतरच कृष्णाच्या मूर्तीला स्पर्श करा.

* कृष्णाची मूर्ती घरी आणल्यानंतर श्रीहरीचं नामस्मरण करत राहायला हवं. तसंच बाळकृष्णाला जमीन, पलंग किंवा टेबलावर ठेऊ नये. देव्हाऱ्यातच ठेवावं.

* कृष्णाची धातूची मूर्ती दररोज स्वच्छ केली पाहिजे. त्यातही एकादशीला मूर्ती जागची हलवून स्वच्छ करावी.

* श्रीकृष्णाकडे हातून कळत-नकळत झालेल्या चुकांची माफी मागावी.

प्रत्येकाला परमेश्वराचे आशीष हवे असतात. देवाचा वरदहस्त असावा अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी व्रतवैकल्य, उपवास, आराधना आदी उपाय योजले जातात. मात्र मनात भक्ती असेल तर नैमित्यिक कर्म करत असतानाही देवाचे आशिष मिळू शकतात. त्यासाठी उग्र उपासनेची आवश्यकता असतेच असं नाही. शेवटी भक्ती ही करण्याची गोष्ट नसून अनुभवण्याची गोष्ट आहे हे समजून घ्यायला हवं.

# ओळख होईल महाशक्तीची

सध्या लोकांच्या धार्मिक भावना अधिकाधिक संवेदनशील होत आहेत. धर्म हा प्रत्येकाच्या अस्मितेचा केंद्रबिंदू असतो हे मान्य आहे. पण सध्या धर्माच्या व्याख्या संकुचित होत असल्याचं दिसत आहे. शिवाय कर्मकांड, रुढी-परंपरांचं पालन म्हणजे धर्मपालन असा चुकीचा अर्थ घेतला जात असल्याचंही दिसून येत आहे. म्हणूनच मुळात धर्मपालन म्हणजे काय हे समजून घ्यावं आणि देवाच्या समीप पोहोचण्याचे श्रेयस्कर मार्ग अनुसरावे.

आजवर धर्मातील अनुभवासंबंधी अनेक संतांनी, भक्तांनी निरनिराळे दाखले देऊन स्पष्टीकरण केलेलं दिसून येतं. बऱ्याचदा या धार्मिक अनुभवास अद्भूत गोष्टींची सांगड घातलेली असते. तर्काच्या आणि बुद्धीच्या दगडावर प्रत्येक गोष्ट घासून बघणाऱ्या व्यक्तींना या गोष्टी मान्य होण्याजोग्या नसतात. त्यांचं म्हणणं असतं, धर्म किंवा ईश्वरी शक्ती ही सर्वांसाठी महत्त्वाची गोष्ट असेल तर रोजच्या दिनक्रमात नित्याने तिची अनुभूती आली पाहिजे. ज्याप्रमाणे शास्त्रज्ञ जगातील वस्तुस्थिती बघतो आणि घडणाऱ्या गोष्टींच्या आधारे नियम ठरवतो त्याचप्रमाणे धर्मविषयक गोष्टीही प्रत्यक्ष दिसायला हव्या. त्याचं आकलन होण्यासाठी कारण नसताना गूढतेचं आवरण घालणं उपयोगाचं नसतं. प्रत्येक मानवाच्या आयुष्यात नित्याने घडत असणाऱ्या गोष्टीत धर्माचं किंवा ईश्वराचं रुप प्रकट व्हायला हवं, असा तर्कनिष्ठ बुद्धिवाद्यांचा युक्तीवाद असतो. धर्माचा गाभा असणारी भक्ती हा अत्यंत श्रेष्ठ असा धार्मिक अनुभव असून मानवी जीवनातील परमसुखाचं साधन आहे. मात्र आधुनिक सुशिक्षित वर्गात या विषयी उदासिनता दिसून येते. हे सत्य स्वीकारायला ते तयार नसतात. कारण भक्ती ही केवळ भावनाप्रधान, अशिक्षित लोकांसाठीच आहे; शहाण्या आणि विचारी लोकांचा मार्ग भिन्न आहे अशी खुळी समजूत त्यांच्या मनात असते.

वास्तविक भक्ती ही शहाणा, अज्ञानी, गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध साऱ्यांसाठीच असून परमेश्वराच्या अनुभूतीसाठी अतिशय सोपी पायवाट आहे, असं सगळ्या संतांनी सांगितलं आहे. सर्वांसाठी असणाऱ्या भक्तीचं रुप नित्याच्या व्यवहारात सहजपणे प्रकट होत असतं. जगात ईश्वरी सत्ता आहे की नाही यावर अनेक लोक तार्किक वाद घालतात. मोठमोठ्या ग्रंथांचे दाखले दिले जातात. मात्र जगात ईश्वराची सत्ता आहे हे जाणून घेण्यासाठी मोठ्या ग्रंथांचं वाचन, अभ्यास, विद्वत्ता, अधिकार, बुद्धिमत्ता यापैकी कशाचीही गरज नसते. याचं अगदी सोपं उदाहरण पाहू. एका रानात एक आदिवासी माणूस झोपला आहे. तो अशिक्षित आहे. असं असूनही जाग आल्याबरोबर त्याला पृथ्वी, सूर्य, पाण्याचे प्रवाह, वृक्षराजी, पर्वत आदी दिसतात. त्याचं आकलन होतं. वास्तविक पाहता ही सर्व दृश्ये आपण तयार केलेली नाहीत. किंबहुना, आपणास ती तयार करता येण्याजोगी नाहीत. या सगळ्यांना तयार करणारी, नियंत्रित करणारी एक वरिष्ठ सत्ता असली पाहिजे हे त्या आदिवासी



व्यक्तीच्या सहज लक्षात येईल. त्यासाठी त्याला कुठलाही अभ्यास करावा लागणार नाही. आणखी थोडा विचार केल्यावर त्याच्या लक्षात येईल की, या सर्व दृश्यांची माझ्या ठिकाणी म्हणजे शरीरातील अवयवांकडून प्रचिती येते म्हणूनच या दृश्यांना किंमत आहे.

भक्ती विशेष

जगात सुगंध आहे, पण त्याचं अस्तित्व समजण्यासाठी मला नाकाची आवश्यकता आहे. नाक नसेल तर जाई, मोगरा, गुलाब आदी शेकडो सुवासिक फुलांचा काय उपयोग? जगात नाना चवींचे रस आहेत, पण जीभ नसेल तर या भिन्न चवींना काय अर्थ आहे? पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते खरी असली तरी त्यांचा अनुभव घेता येत नसेल तर या पंचमहाभूतांना काही अर्थ उरणार नाही. ही गोष्टदेखील त्या अशिक्षित मनुष्याच्या सहजपणे ध्यानात येईल. थोडा जास्त विचार केला तर त्या व्यक्तीला आणखीही काही गोष्टींची अनुभूती येईल. हे जग माझ्यासाठी निर्माण केलं आहे त्याअर्थी निर्माण करणाऱ्या सत्तेचा आणि माझा अतिशय निकटचा, प्रेमाचा संबंध असला पाहिजे हे त्याला समजेल. ही गोष्ट त्याच्या लक्षात आल्यानंतर त्या परमसत्तेचा आणि आपला जिव्हाळ्याचा संबंध आ-ळखणं त्याला सहजसोपं होईल आणि व्यवहारात प्रत्येक क्षणी त्या परमसत्तेचं स्मरण होईल. अशा या प्रेमाची, जिव्हाळ्याची ओळख पटणं हीच भक्ती होय आणि ही ओळख पटण्यासाठी कुठल्याही अधिकाराची जरूरी नसते. तर्क, अनुमान यांचीही आवश्यकता नसते. कारण त्या सत्तेची ओळख ही प्रत्यक्ष समोरासमोर होत असून अतिशय सुंदर आहे. ही सर्वांना होणं सहज शक्य आहे. त्यासाठी फक्त आपल्या दृष्टीत थोडा बदल करणं आवश्यक असतो.

चराचरात अस्तित्वात असण-ारी महाशक्ती मनुष्यावर सगळ्या सुखांची उधळण करत असते, कारण तिचा आणि मानवी जीवनाचा अत्यंत निकटचा आणि प्रेमाचा संबंध असतो. मानवाच्या जन्माशी म्हणजेच उगमाशीच या परमसत्तेच्या जिव्हाळ्याचा संबंध दिसून येतो. ही शक्तीच माता-पित्यांच्या देहाचा आश्रय घेऊन जीवनाचा उदय करते. मातेच्या उदरात जलबिंदूच्या रुपाने असणाऱ्या जीवनाचं अतिशय हळुवारपणे आणि प्रेमाने पालन करते. त्या जीवाच्या ठायी ज्ञान, आनंद, कर्म यांची जाणीव निर्माण करते. मातेच्या उदरातील जठराग्नीचं अमृत बनवून जीवाला वाढवते. अशा प्रकारे त्या शक्तीने आपल्याला अस्तित्व दिलं आहे हे लक्षात आल्यानंतर आपला आणि त्या परमसत्तेचा केवढा निकटतेचा आणि प्रेमाचा संबंध आहे हे सहजपणे लक्षात येईल. वैद्यकीय शास्त्राने गर्भधारणा कशी होते, मूल कसं जन्माला येतं या विषयी संशोधन करून स्पष्टीकरण केलेलं असलं तरी बीजनिर्मिती, बिजाचं पालनप-ोषण या सर्व गोष्टी त्या परमसत्तेच्या अधीन आहेत. या संबंधाचं स्मरण करणं म्हणजेच भक्ती होय. भक्ती ही करायची नसून ओळखण्याची गोष्ट आहे. भक्ती ओळखण्यासाठी काही वेगळे उपद्व्याप करण्याची गरज नाही. प्रपंचात असतानाही सहजपणे भक्ती घडते. आपल्या प्रिय बालकाच्या निरागसतेचं, त्याच्या बाललिलांचं आपल्याला केवढं कौतुक वाटतं. तशीच भावना त्या ईश्वराबद्दल ठेवून तू मला गर्भात वाढवलेस, मी काहीही न करता मला डोकं, नाक, कान दिलेस, तुझ्या या प्रेमाची परतफेड मी कशी करू? असा प्रश्न मनात निर्माण होईल तेव्हा प्रभूची प्रीती हळूहळू लक्षात येऊन तिचा ध्यास लागेल. हा ध्यास अथवा आठवण हीच भक्ती आहे. ही भक्ती आपण किती सहज आणि सुलभ मार्गाने अनुभवू शकतो यातच भक्तीची सरलता दडलेली आहे.

# लाभदायी भेटवस्तू

आप्तस्वकियांना भेटवस्तू देणं ही एक सर्वसाधारण बाब. भेटवस्तू देणं आणि घेणं आनंददायी असतं. अशा वेळी विशिष्ट प्रकारची वस्तू भेट दिली किंवा भेटीदाखल ती मिळाली तर शुभं मानलं जातं. काही वस्तू भाग्यकारक मानल्या जातात. अशाच काही वस्तूंविषयी जाणून घेऊ या...

* मातीची मूर्ती किंवा वस्तू भेट देणं किंवा भेट म्हणून स्वीकारणं शुभ मानलं जातं. मातीच्या वस्तू घरात ठेवल्याने अडकलेला पैसा मिळतो आणि संपत्तीत वृद्धी होते.



* दोन गणपती प्रतिमा असण-ारी मूर्ती किंवा चित्र भाग्यकारक मानलं जातं. अशी मूर्ती भेट दिल्याने घरात सुखसमृद्धी नांदते, असं म्हणतात. पण दोन्ही मूर्तींमध्ये गणपतीचं तोंड समोरच्या बाजूला असावं, हे लक्षात ठेवा.

* भेटीदाखल कपडे देणं भाग्यकारक समजलं जातं. कपडे भेट देणाऱ्या आणि घेणाऱ्या अशा दोघांचाही भाग्योदय होतो, असं म्हणतात.

वास्तू

* शुभ प्रसंगी हत्ती किंवा हत्तीची जोडी भेट म्हणून देणं शुभं मानलं जातं. सोनं, चांदी, लाकूड किंवा पितळ्याचा हत्ती भेट म्हणून देता येईल.

* चांदीच्या वस्तू देणं तसंच घेणं शुभ मानलं जातं. चांदीची नाणी किंवा वस्तू दिल्याने दोघांचाही भाग्योदय होतो असं म्हणतात. चांदीच्या वस्तू भेटीदाखल दिल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते अशी श्रद्धा आहे.

* फेंगशुई शास्त्रात सात घोडे शुभ मानले आहेत. सात पांढऱ्या घोड्यांचं चित्र किंवा मूर्ती भेट देणं लाभदायी ठरतं. यामुळे संपत्तीत वृद्धी होते.

# साथ परमेश्वरी शक्तीची

माणसाच्या आयुष्यात अनेक अडचणी येतात. त्याला बराच संघर्ष, अपयशाचा सामना करावा लागतो. सततचं अपयश, संघर्ष यामुळे मनुष्य खचून जातो. सगळ्या आशा संपतात. स्वतःवरचा विश्वास डळमळीत होऊ लागतो. अशा वेळी मनुष्याला आधार असतो तो परमात्म्याचा. सगळं काही संपलंय असं वाटत असताना माणसाने परमेश्वरी शक्तीवर विश्वास ठेवला पाहिजे.

बोध

परमेश्वरी शक्तीच्या मदतीने माणूस कोणत्याही क्षणी आश्चर्यजनक यश मिळवू शकतो. परमेश्वरी शक्तीवर विश्वास ठेवणारा मनुष्य कधीही निराश होत नाही. विपरित परिस्थितीतही स्वतःच्या बाजूने वळवण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होते. परमेश्वरी शक्ती असीम, अनंत आहे. या शक्तीची साथ लाभली तर मनुष्य कोणतीही गोष्ट प्राप्त करू शकतो. परमेश्वराच्या साथीने माणूस अशक्य, अवघड वाटणारी गोष्टही अगदी सहजतेने साध्य करू शकतो.


माणसाच्या मनात देवाविषयीची श्रद्धा, भक्तीभाव जागृत झाला की कोणतीही गोष्ट किंवा परिस्थिती आपल्या विरोधात असल्याचं त्याला जाणवत नाही. देवावर अटळ विश्वास असणारे लोक प्रत्येक परिस्थितीत आनंदी राहण्याचा प्रयत्न करतात. विपरित परिस्थितीही आपल्याला अनुकूल असल्याचं ते मानतात आणि सकारात्मकतेने सामोरे जातात. या परिस्थितीतून बरंच काही शिकता येईल आणि आपण यातून बाहेर पडू यावर त्यांचा विश्वास असतो. म्हणूनच त्यांचा आत्मविश्वास कधीही डळमळत नाही. वाईट परिस्थितीचा सामना करताना ते डगमगत



नाहीत. भगवान श्रीकृष्णाने गीतेत नमूद केलंय की, मला शरण येणारा भक्त भवसागरही तरून जातो. म्हणूनच वाईट परिस्थितीत चीडचीड करण्याऐवजी माणसाने धीर धरायला हवा. सत्य, धाडस आणि धैर्य यांच्या बळावर माणूस कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो.

जो माणूस स्वताकदीवर विश्वास ठेवतो त्याला परमेश्वराची साथ मिळते. माणसाला आयुष्याच्या प्रत्येक वळणावर देवाची गरज असते. त्यामुळे त्याने कायम देवाचं स्मरण करत राहावं. आयुष्यात सुख असो किंवा दुःख... देवाला विसरू नये. यामुळे त्याच्या आयुष्यात कधीही दुःख येणार नाही. आस्था, समर्पण आणि त्यागाची भावना आपल्याला परमेश्वराशी जोडू शकते.

# कसं असावं जीवन?



आर्य चाणक्याने जगण्याचे धडे दिले. त्याने दिलेले धडे आजच्या काळातही लागू पडतात. पैशांचे व्यवहार करताना किंवा इतरांशी वागताना नेमकी काय काळजी घ्यावी याविषयी त्याने लिहून ठेवलंय. चाणक्याच्या शिकवणीप्रमाणे वागल्यास आयुष्य अनेक अर्थांनी आनंददायी बनू शकेल.

* आपल्याकडचा पैसा योग्य व्यक्तीला दिला पाहिजे. समुद्राच्या पाण्याचं बाष्पीभवन झाल्यानंतर ते ढगात साठतं. ढगांमध्ये खाऱ्या पाण्याचं रूपांतर गोड्या पाण्यात होतं. त्याचप्रमाणे योग्य व्यक्तीला दिलेल्या धनात वृद्धी होते.

* विषारी नसलेल्या सापानेही विषारी असल्याचं भासवलं पाहिजे. याचा अर्थ आपल्यातले दोष इतरांना दाखवू नये. आपण सक्षम आणि समर्थ असल्याचं इतरांना दाखवायला हवं.

* भीती दूर पळवा. भीतीमुळे आपण पुढे जाऊ शकणार नाही. भीतीमुळे आपण ध्येय साध्य करू शकणार नाही.

चाणक्यनीती

* या जगात आपण एकट्याने प्रवेश करतो. एकटेच जगाचा निरोप घेतो. चांगल्या वाईट कर्मांची फळं एकटेच भोगतो. मनुष्याला आपल्या कर्मांची फळं भोगावीच लागतात.

* आपल्याला काय करायचंय हे कोणालाही सांगू नका. आपले प्रयत्न उघड होऊ देऊ नका. प्रगतीच्या दिशेने पुढे जात रहा.

* शिक्षण सर्वात महत्त्वाचं आहे. शिक्षणाच्या बळावर आपण अनेक गड सर करू शकतो. आपल्या ज्ञानाच्या बळावर माणूस लोकांना आकर्षित करू शकतो.

* मन कायम स्थिर असलं पाहिजे. आयुष्यात समाधानी असलं पाहिजे. लोभी असणं हा विकार आहे. त्यामुळे लोभ त्यागावा. दयाभाव जागृत ठेवावा.

# श्रीरामाच्या चरित्रातून

भगवान श्रीरामाचा जन्म त्रेतायुगातला.आपल्या जीवितकार्यात श्रीरामाने बराच संघर्ष केला. विपरित परिस्थितीचा सामना करत त्याने रावणाचा संहार केला. अयोध्येत रामराज्याची स्था-पना करून यशाची चव चाखली. कठीण काळातही तो डगमगला नाही. श्रीरामाच्या कर्तृत्वाची, त्याच्या कार्याची चर्चा आजही होते. श्रीरामाकडून शिकण्यासारखं बरंच काही आहे. पण काही गोष्टी आजच्या काळातही तंतोतंत लागू पडतात. आजच्या काळात श्रीराम चरित्रातल्या काही गोष्टी अंगिकारल्या तर कोणत्याही समस्येचा सामना करावा लागणार नाही तसंच वाईट काळातही आपण तरून जाऊ. श्रीरामाकडून लाईफ मॅनेजमेंटची ही सूत्र शिकता येतील.

* श्रीराम मर्यादापुरुषोत्तम होता. त्याने कायमच मर्यादेचं पालन केलं. त्याच्याप्रमाणे आपणही मर्यादेचं पालन करायला हवं. मर्यादा पाळली तर आयुष्यात फारशा अडचणी येणार नाहीत.

* माणसाने आपल्या पदाच्या मर्यादेत मान राखून काम करायला हवं. रयतेचा, जन-तेचा विचार करायला हवा. श्रीराम अयोध्येचा राजा असताना रयतेने सीतेच्या चरित्रावर संशय घेतला. त्यावेळी रामाने सीतेला वनात पाठवलं. कुटुंबाच्या आधी जनतेचा विचार करायला हवा हेच त्याच्या या कृतीतून दिसून येतं.



* श्रीरामाने कायम एकपत्नीव्रताचं पालन केलं. आजच्या काळातही माणसाने परस्त्रीवर वाईट नजर ठेवली नाही आणि आपल्या पत्नीशी एकनिष्ठ राहण्याचा नियम पाळला तर आयुष्यात आनंद फुलू शकतो.

* श्रीरामाने मोठ्यांना मान दिला. त्यांच्या आज्ञेचं पालन केलं. वडिलांच्या सांगण्यावरून तो वनवासात गेला.

लाईफ मॅनेजमेंट

आजच्या काळातल्या मुलांनीही आई-वडील आणि ज्येष्ठ व्यक्तींचं सल्ला मानला पाहिजे. त्यांच्या शब्दाला किंमत आणि मान दिला पाहिजे. यामुळे आयुष्यात यश मिळू शकेल. त्यांच्या अनुभवाचे बोल प्रत्येकाच्या कामी येतील.

# मोक्षदायी सरोवरं

भारतात तीर्थस्थानाला प्रचंड महत्त्व आहे. नदी, तलाव, सरोवरात आंघोळ करून पापांपासून मुक्ती मिळवण्याचा भक्तांचा प्रयत्न असतो. भारतात अशी अनेक तीर्थस्थानं आहेत. देशातल्या पवित्र नद्यांविषयी आपण जाणतोच. या लेखात आपण पवित्र अशा पाच सरोवरांविषयी जाणून घेऊ या...

* म्हैसूरजवळ पंपा सरोवर आहे. हे एक ऐतिहासिक ठिकाण मानलं जातं. हंपीजवळ अनेगुंदी नावाचं गाव आहे. अनेगुंदी म्हणजे रामायणकाळातलं किष्किंधा नामक शहर. या गावाच्या जवळच पंपा सरोवर आहे. या सरोवराच्या जवळच्या पश्चिमेकडील पर्वतावर जीर्ण झालेली मंदिरं आढळतात. या पर्वतावर असलेल्या गुहेला शबरी गुहा असं म्हटलं जातं. याच गुफेत शबरीने रामाला बोरं खायला दिली होती, असं मानलं जातं. पंपा सरोवराचा रामायण काळाशी संबंध असल्याने इथे स्नान करणं पवित्र मानलं जातं.

तीर्थक्षेत्र

* गुजरातमधल्या कच्छ जिल्ह्यातल्या लखपत तालुक्यात नारायण सरोवर वसलंय. याला भगवान विष्णूचं सरोवर मानलं जातं. विविध पुराणांमध्ये या सरोवराचा उल्लेख आढळतो. या सरोवरात साक्षात भगवान विष्णूने स्नान केलं होतं, असं म्हणतात. म्हणूनच या सरोवरात स्नान केल्याने मोक्ष मिळतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

* राजस्थानातलं पुष्कर हे ठिकाण प्रसिद्ध आहे. इथल्या सरोवराजवळ ब्रह्मदेवाने यज्ञ केला होता, असं म्हणतात. त्यामुळे हे सरोवर मोक्षदायक समजलं जातं. श्रीरामाने राजा दशरथाचं श्राद्ध इथेच केल्याचं मानलं जातं.

* अहमदाबादपासून १३० किलोमीटर अंतरावर असलेल्या बिंदू



सरोवराचं महत्त्वही वादातीत आहे. या सरोवराच्या काठी कर्दम मुनींनी तपश्चर्या केली होती, असं मानलं जातं. पुराण आणि धर्मग्रंथांमध्ये तसे उल्लेख आढळतात.

* कैलास-मानसरोवर हिंदू धर्मीयांचं पवित्र तीर्थस्थान आहे. इथे देवी पार्वती स्नान करते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ब्रह्मदेवाने या सरोवराची निर्मिती केल्याचा उल्लेख धार्मिक ग्रंथात आढळतो. या सरोवराजवळ भगवान शिवाचं निवासस्थान म्हणजे कैलास पर्वत आहे. हिंदूंबरोबर बौद्ध धर्माचे अनुयायीदेखील या सरोवराला पवित्र मानतात.

# १३०० झाडांची क्षणार्धात राखरांगोळी

## २० लाख रूपयांचे नुकसान



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :**
अमरावती महामार्गावरील कोंढाळी नजिकच्या जामगढ़ येथील शेतकरी रणनवरे यांच्या संत्रा बागेतील १३०० झाडे आगीत जळून राख झाली. यासोबतच बागेत लावलेली ठिबंक सिचनाचे साहित्य व स्प्रीक्लरही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. यात शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

जामगढ़ येथील प्रगतिशील शेतकरी विजयसिंह रणनवरे, मदनराव रणनवरे, प्रशांत रणनवरे,तथा रणजीत रणनवरे यांची संत्रा बाग आहे. तेथे ओलीताची व्यवस्था असल्याने ही बाग उत्तमरित्या बहरली होती. बागेत संत्र्याची १३०० झाडे होती.

बांधावर लावलेले उच्च प्रतिचे सहा हजार बांबूचाही आगीत कोळसा झाला. यामुळे रणनवरे बंधूंचे २० लाखांहून अधिकचे नुकसान झाले. या घटनेची तक्रार विजय सिंह रणनवरे यांनी २५ एप्रीलला कोंढाळी पोलीस ठाण्यात नोंदविली आहे. या प्रकरणी तपास करण्यात येत आहे.

# कर्जमाफीसाठी अडवला अजित पवार यांचा ताफा

■ **वृत्तसंस्था**
**परभणी, दि. २६ :**
परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेस कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची आंदोलकांनी मागणी केली. दरम्यान, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले आहे.



# पंचायत समितीवर धडकल्या महिला

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. २६ :**
एप्रिलच्या उष्णतेने आधीच तापलेले गाव आता पाण्याअभावी अक्षरशः होरपळू लागले आहे. उमरखेड तालुक्याच्या निंगनूरच्या हिरामण नगर भागात सर्व विहिरी आटल्याने नागरिकांना टंचाईचे गंभीर संकट भेडसावत आहे.

महिला भर उन्हात घागरी घेऊन गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात धडकल्या आणि पाणी देता का पाणी? असा असा सवाल करीत त्यांनी प्रशासनाला जागे केले.


ग्रामपंचायती अंतर्गत हिरामण नगर येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. गटविकास अधिकारी किरण कोळपे यांच्या दालनासमोर ठिय्या मांडला.

याबाबत दखल घेऊन गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी जलजीवन मिशनचे अभियंता सौरभ सोनी यांना बोलावून हिरामण नगर येथील पाणीटंचाईसंबंधी पर्यायी व्यवस्थेबाबत चर्चा केली. पाणीटंचाई समस्या लवकरच दूर करू, असे आश्वासन आंदोलनकर्त्या महिलांना दिले.

# राजकीय इच्छाशक्तीचा सरकारमध्ये अभाव

## ॲड. प्रकाश आंबेडकरांचा मोदी सरकारवर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :**
पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीय सैन्य पाकिस्तानला ठोस प्रत्युत्तर देण्यास तयार आहे. पण सरकारमध्ये असे काही करण्याची राजकीय इच्छाशक्ती दिसत नाही, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधताना केली.



जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे गत 22 तारखेला अतिरेकी हल्ला झाला. त्यात महाराष्ट्राच्या 6 जणांसह एकूण 22 पर्यटक मारले गेले. या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात संतापाचे वातावरण पसरले आहे.

केंद्रानेही पाकला जशासतसे प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी सरकारमध्ये ठोस कारवाई करण्यासाठी लागणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसत असल्याचा आरोप केला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारकडून चोख प्रत्युत्तराची अपेक्षा होती. पण, सरकारकडून अशा कोणत्याही कारवाईचे संकेत दिसत नाहीत. सरकारने पाकसोबतचा सिंधू जलवाटप कराराला स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. पण या करारांतर्गत येणाऱ्या नद्यांचे पाणी कसे अडवणार? कसे वापरणार? याचा खुलासा केला नाही.

सरकार त्यांची खोली वाढवणार असल्याचे कळते. पण त्याहून अधिकचे पाणी कसे रोखणार? हा प्रश्न आहे. या कराराला वर्ल्ड बँकेची गॅरंटी आहे. त्याचे काय परिणाम होणार? हे ही सरकारने स्पष्ट केले पाहिजे.

**कागदी घोडे नाचवण्याचा प्रयत्न**

पहलगाम हल्ल्यानंतर सर्वसामान्यांची तीव्र प्रतिक्रिया आहे. सरकारने एवढी शस्त्रास्त्रे विकत घेतली. विमाने विकत घेतली. पाणबुड्या विकत घेतल्या. भारतात लढाऊ विमाने तयार केली. त्या सर्वांचा उपयोग काय? असा प्रश्न सर्वसामान्य माणूस विचारत आहे. त्यामुळे सरकारने कागदोपत्री घोडे नाचवणे बंद करून या प्रकरणी काही ठोस कारवाई केली जाणार आहे का? हे सांगावे.

**आपण काय करू हे महत्त्वाचे**

ते पुढे म्हणाले, सद्यस्थितीत भारतीय लष्कर पाकला चोख प्रत्युत्तर देण्यास तयार असल्याचे दिसून येत आहे. पण सरकारमध्ये निर्णय घेण्याची राजकीय इच्छाशक्ती दिसून येत नाही. सरकारने निर्णय घ्यावा. सरकारला लोकांचा पाठिंबा आहे. जनता सरकारच्या निर्णयासोबत राहील. जागतिक समुदायानेही दहशतवादाच्या मुद्यावर भारताला पाठिंबा दिला आहे. त्यानंतरही कोणताही कारवाई केली जात नाही.

सरकारने युद्ध नाही तर किमान दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण स्थळांवर हल्ले करावेत. ते उद्ध्वस्त करावेत. अतिरेक्यांचे अड्डे पाकच्या हद्दीत आहेत. पाकिस्तान हे अड्डे उद्ध्वस्त करत नसेल, तर ते तुम्ही करा. अशावेळी पाक काय करेल यापेक्षा आपण काय करू शकतो हे महत्त्वाचे आहे. यावर पहिल्यांदा विचार होण्याची गरज आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ते पुढे म्हणाले, अतिरेक्यांनी धर्म विचारून गोळ्या घातल्यासंबंधी काहीजण हो म्हणतात तर काही जण नाही म्हणतात. पण येथील माध्यम व राजकीय नेते नरेटिव्ह सेट करत आहेत.

ज्यांचा बळी गेला ते भारतीय होते. या हल्ल्यात खिश्चन व मुस्लिमही मारले गेले. या हल्ल्यानंतर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. पण पंतप्रधान या बैठकीला गेले नाही. त्यावरुन ते किती गंभीर आहेत हे स्पष्ट होते. पंतप्रधानांनी या बैठकीला ब्रिफिंग करणे महत्त्वाचे होते.

सरकारने पहलगाम हल्ल्यानंतर पर्यटकांना जम्मू काश्मीरमधून बाहेर काढून चूक केली. खरेतर त्यांना पाठिंबा देण्याची गरज होती. पर्यटकांच्या मनात भीती नव्हती, तर त्यांना सुरक्षा मिळेल की नाही हा प्रश्न होता. सरकारने पर्यटकांचा खर्च उचलण्याची गरज होती, असेही आंबेडकर यावेळी म्हणाले.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने या प्रकरणी सर्वसामान्य नागरीक सरकारच्या पाठिशी असल्याचे दाखवण्यासाठी जनतेला २ मे रोजी हातात तिरंगा घेऊन मुंबईतील हुतात्मा चौकात एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

# सहकार नेत्यांनी पक्ष घरगड्यासारखा वापरला

## आमदार अमोल मिटकरी यांची सडकून टीका

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. २६ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही आता नेत्यांची पार्टी नव्हे तर कार्यकर्त्यांची पार्टी आहे. इथे कुणीच नेता नाही. यापूर्वी जिल्ह्यातील सहकार नेत्यांनी पक्ष हा घरगड्यासारखा वापरला. त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली. अशा फसवणूक करणाऱ्यांना धडा शिकवणार, असा टोला आमदार अमोल मिटकरी यांनी लगावला. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी त्यांनी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष मो. बद्रुजमा मो. आदिल यांना संविधानाची प्रत भेट दिली. राष्ट्रवादी काँग्रेस असा पक्ष असा आहे जिल्हाध्यक्ष पदी मुस्लीम चेहरा दिला आहे, असे सांगून आमदार मिटकरी म्हणाले की, जिल्ह्यातील सहकार नेत्यांनी पक्ष हवेत ठेवला होता. त्यांचा पक्षाचा वापर केला.

पक्षात काम करणाऱ्याला संधी आहे. पक्षाची ध्येय धोरणे तसेच सरकारच्या योजना सामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी पक्ष कटिबद्ध आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष मो. बद्रुजमा म्हणाले की, पक्षात गटबाजीला थारा नाही. प्रत्येकाला विश्वासात घेऊन आपण काम करणार आहोत. विधानसभा २०२४ च्या निवडणुकीनंतर जिल्हाध्यक्ष हे पद रिक्त असल्याने अनेक लोकांनी या पदासाठी प्रयत्न केला.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचारांचा पक्ष असून माझ्यासारख्या अल्पसंख्याक व्यक्तीवर टाकलेला विश्वास नक्कीच सार्थ ठरवेल. पक्ष प्रमुख अजित पवार, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, दत्ता मामा भरणे, इंद्रनील नाईक, नवाब मलिक, रुपाली चाकणकर, आमदार संजय खोडके, आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्यावर दाखवलेला विश्वास हा मोठा आहे. बुथस्तर मजबूत करण्यावर आपला भर राहणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल काळणे, महिला जिल्हाध्यक्ष रुपालीताई वाकोडे उपस्थित होते. पाटीर्ची आधीची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे.

# सोन्याची मागणी सातत्याने वाढतीच



लोकरंग

अलीकडच्या दोन महिन्याच्या कालावधीत जरी जागतिक स्तरावर शेअर बाजारात वेगवगळ्या कारणांनी प्रचंड पडझड सुरु असली तरी त्याच तुलनेत सोन्याच्या भावात मात्र सातत्याने वाढ होताना दिसतेय.

जागतिक स्तरावर सोन्याला बाजारात प्रचंड मागणी असल्यामुळेच सोन्याचा भाव हा दिवसेंदिवस वधारतो आहे. हा भाव सध्या प्रति तोळा १ लाखांच्या घरात गेलेला आहे. याच पार्श्वभूमीवर ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी कौन्सिल चे अध्यक्ष राजेश रोकडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**सोन्याचा भाव हा प्रचंड वधारतो आहे. त्यामागचे कारण काय?**

■ सोन्याचा भाव किरकोळ स्तरावर १ लाखाच्या वर जाऊन आल्यामुळे सोन्याच्या मागणीवर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. मात्र हा परिणाम तात्कालिक असून येत्या काळात सोन्याची मागणी वाढतीच राहणार आहे.

मुंबईच्या सराफ बाजारात किरकोळ स्तरावर २४ करेट सोने प्रति १० ग्रॅम १ लाख १ हजार ३५० रुपयांना विकले गेले. २२ कॅरेट सोन्याचा भाव ९२ हजार ९०० रुपये राहिला. या पार्श्वभूमीवर सोन्याची मागणी कायम राहण्यासाठी तसेच ती वाढती राहण्यासाठी ३० एप्रिल ला येणारी अक्षय तृतीया कारणीभूत असणार आहे.

**मागील आर्थिक वर्षात सोन्याच्या आयाती बाबत काय स्थिती होती?**

■ आर्थिक वर्ष २०२३ आणि २०२४ मधील सोन्याच्या आयातीची आकडेवारी तपासायची म्हटली तर,२०२३ या वर्षात ७४१ टन सोने आयात केले गेले. २०२४ या यावर्षात ८०२ टन सोन्याची आयात झालेली आहे. त्याचवेळी सोन्याचा भाव हा २५ ते ३० टक्के अधिक होता. २०२४ यामध्ये सोन्याचा भाव सातत्याने बदलत राहिला आणि आता यंदाच्या वर्षी वाढत्या मागणीमुळे सोने १ लाखाच्या वर गेले आहे.

**भविष्यकाळात सोन्याच्या विक्री बाबत काय स्थिती असेल?**

■ ग्राहकाकडून सोने खरेदी करण्याला प्रचंड सकारात्मक प्रतिसाद असल्यामुळे भविष्यकाळात सोन्याच्या भावात अशीच वृद्धी होत राहणे अपेक्षित आहे. त्याचवेळी सोन्याची मागणी देखील सतत वाढत राहणार आहे. लग्नसराईचा काळ असेल, आपले विविध सण आणि उत्सव लक्षात घेता ग्राहकांकडून सोन्याची मागणी वाढतच राहणार आहे. त्यामुळे सोन्याचा सराफ बाजार हा भविष्यात तेजीत असेल यात शंका नाही. ■ ■

### धार्मिक महत्व असलेले पंचवटी

नाशिक शहराला खूप मोठा इतिहास आणि महान पौराणिक पार्श्वभूमी आहे. भगवान राम आपल्या वनवासा दरम्यान पंचवटी येथे वास्तव्य करीत होते आणि त्यांनी आपल्या वनवासाचा बराच काळ इथे घातला. त्यानंतर अगस्ती ऋषी तपस्यासाठी नाशिकमध्ये राहिले होते, गोदावरी नदीचा उगम सुद्धा नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथुन उगम पावते. बारा ज्योतिर्लिंगपैकी एक त्र्यंबकेश्वर शिव मंदिर त्र्यंबक नाशिक येथेच आहे. नाशिकला ऐतिहासिक वारसा सोबत नाशिकने काही भारताला अनेक प्रसिद्ध व्यक्तीमत्व सुद्धा दिले आहेत. ज्यामध्ये वीर सावरकर, अनंत कान्हेरे, लोकमान्य टिळक, दादासाहेब पोतनीस, बाबूभाई राठी, व्ही.व्ही. शिरवाडकर आणि वसंत कानेटकर ही काही प्रसिद्ध नावे आहेत. नाशिकला मिनी महाराष्ट्र असेही म्हणतात. नाशिकची ओळख सर्वात जास्त इथल्या धार्मिक पार्श्वभूमी वरून आहे, ह्या शहरातील महत्वाचे पर्यटन स्थळ जिथे तुम्ही नक्की भेट दिली पाहिजे. नाशिक शहरामध्ये मध्यभागी ठिकाणी पंचवटी हा परीसर आहे आणि हा गोदावरी नदीच्या डाव्यातीरावर आहे. इथेच सुप्रसिद्ध काळाराम मंदीर आहे, आणि त्याला काळाराम मंदिर जवळ ५ वटवृक्षांचा समुह आहे हा समुह पाच वटवृक्षांपासून तयार झाला असल्या मुले ह्या परिसरास पंचवटी असे संबोधले जाते. ह्याचा अर्थ पंच म्हणजे पाच व वटी म्हणजे वडाचे झाड असा आहे. ह्या परिसरात आपल्याला खूप मंदिरे बघायला मिळतात काळाराम मंदिर, कपालेश्वर मंदिर, गंगा–गोदावरी मंदिर, सुंदर नारायण मंदिर, टाळकुटेश्वर मंदिर, निळकंठेश्वर मंदिर, गोराराम मंदिर, मुरलीधर मंदिर, तिळभांडेश्वर मंदिर, बालाजी मंदिर, सांडव्याची देवी मंदिर, विठ्ठलमंदिर, पाताळेश्वर मंदिर, नारोशंकर मंदिर, रामकुंड, दुतोंडया मारुती, कार्तिकस्वामी मंदिर, काटयामारुती मंदीर, पंचमुखी हनुमान मंदिर, भद्रकाली मंदिर, कपुरथळा स्मारक अशी अनेक मंदिरे पंचवटी व सभोवतालच्या परिसरामध्ये गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर आहेत. या मंदिरांमुळेच नाशिकला पश्चिम भारताची काशी असे म्हटले जाते. ■





# भारतीय व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

मुंबईतील सॅप नाऊ एआय टूरमध्ये, सॅप इंडियाने भारतीय व्यवसायांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) कसा फायदा होत आहे याचे नवीन विश्लेषण उघड केले.

एआय प्रचारापासून वास्तविक-जगातील प्रभावाकडे वाटचाल करत, भारतीय उद्योग व्यवसाय ऑपरेशन्समध्ये एआय उपायांचा अवलंब करत आहेत, ज्यामुळे २०२५ हे मोजता येणारे एआय परिणामांचे वर्ष बनले आहे. एंटरप्राइझ ॲप्लिकेशन्स आणि बिझनेस एआय मध्ये आघाडीवर असलेली सॅप या वर्षी बाजार भांडवलीकरणाच्या बाबतीत युरोपमधील सर्वात मोठी कंपनी बनली.

१९९६ मध्ये स्थापन झाल्यापासून, सॅप इंडियन ऑपरेशन्सने विविध क्षेत्रांमध्ये वाढ आणि नवोपक्रमांना पाठिंबा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महिंद्रा अँड महिंद्रा, एशियन पेंट्स, विप्रो लिमिटेड, इन्फोसिस लिमिटेड, वाहदम टीज, ओला, वेकफिट, देहात, जक्वार आणि इतर अनेक आघाडीच्या संस्थांसोबत भागीदारी करून, त्यांनी देशभरात लक्षणीय आर्थिक प्रभाव पाडण्यास मदत केली आहे. मार्च २०२४ ते मार्च २०२५ या १२ महिन्यांच्या कालावधीत भारतातील सॅप ग्राहकांच्या विश्लेषणावर आधारित, भारतातील सर्वात लोकप्रिय एआय वापर प्रकरणे आहेतः एआय-व्युत्पन्न दृश्य अंतर्दृष्टी, सारांश आणि भाषांतरे,एआय-सहाय्यित प्रक्रिया विश्लेषण,असंरचित डेटामधून विक्री ऑर्डर तयार करणे,भाकित अंदाज, नैसर्गिक भाषा प्रश्न. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# प्रेयसीच्या पतीची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. २६ :**
प्रेमसंबंधात आडकाठी ठरत असलेल्या पत्नीच्या प्रियकराने पतीला दारू पार्टीला बोलावले. पती देखील पार्टीसाठी गेला. मात्र तिथे अघटीत घडले. पत्नीच्या प्रियकराने शस्त्राने अतिशय निर्घुणपणे पतीची हत्या केल्याची अतिशय धक्कादायक घटना शुक्रवार (दि. २५) सुमठाणा येथे उघडकीस आली. नितेश किसन निमकर (३३, रा. सुमठाणा) असे मृतक पतीचे नाव आहे. या प्रकरणी राजुरा पोलिसांनी आरोपी प्रियकर नंदकिशोर चरणदास सोयाम (२५, रा. सुमठाणा) याला अटक केली आहे.

मृतक नितेश निमकर याचे वडील किसन निमकर (५६) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी नंदकिशोर सोयाम याचे मुलाची पत्नी हिचे सोबत प्रेमसंबंध होते. रात्री नऊ वाजता मुलगा मृतक नितेश याला आरोपी नंदकिशोर सोयाम याने दारू पार्टी करू म्हणून भ्रमणध्वनी वर संपर्क साधून एका ठिकाणी बोलविले. पाटीर्ला जायचे आहे, म्हणून करून नितेश हा दुचाकीने घराबाहेर पडला. मात्र, रात्री उशीर झाला तरी घरी परत आला नाही. त्यामुळे घरच्यांनी शोधाशोध सुरू केली.

दरम्यान, मुलगा नितेश हा गावाच्या बाहेर एका निर्जनस्थळी रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याची माहिती काही ग्रामस्थानी कुटुंबियांना दिली. घटनास्थळी जाऊन पाहिले असता नितेश हा रक्ताच्या थारोळ्यात मृत पडून असल्याचे आढळून आला.

त्याच्या डोक्यावर प्रहार करून हत्या करण्यात आली, अशी तक्रार वडिलाने पोलिसात केली. त्यावरून पोलिसांनी आरोपी नंदकिशोर सोयाम याच्याविरुद्ध कलम १०३ (१) गुन्हा दाखल करून अटक केली.

पुढील तपास ठाण्याचे प्रभारी अनिकेत हिरडे यांच्या मार्गदर्शनात एपीआय रमेश नन्नावरे करीत आहेत. दरम्यान या प्रकरणी पत्नीही दोषी असून तिला देखील अटक करण्यात यावी अशीही मागणी केली आहे.

# मसाज पार्लरच्या आड देहविक्री

## थायलंडच्या तिघींसह सहा जणींची सुटका

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
पुण्यातील खराडी-मुंढवा रस्त्यावरील एका मसाज सेंटरमध्ये सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश खराडी पोलिसांनी केला आहे.

पोलिसांनी या कारवाईत थायलंडमधील तीन तरुणींसह सहा जणींची सुटका केली. स्पा सेंटरचा व्यवस्थापक लेनखौके किपगेन (30, मणिपूर) याला पोलिसांनी अटक केली आहे. मालक विकास किशोर ढाले (30, अमरावती) याच्याविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खराडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय चव्हाण यांना मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून प्रथम खातर जमा केली. त्यानंतर छापा टाकण्यात आला. व्यवस्थापक आणि मालकाने तरुणींना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याचे उघड झाले. सुटका करण्यात आलेल्या सर्व तरुणींना न्यायालयाच्या आदेशाने सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. गेल्या वर्षी शहरात 33 मसाज सेंटरवर कारवाई करून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.

# आयपीएल क्रिकेट सामन्यावर फिरता जुगार

## सट्टेबाजांसाठी बुलेटने घरपोच सेवा

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २६ :**
देशभरात इंडियन प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेची धूम सुरु आहे. त्यातच आता प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविण्यासाठी सर्वच संघात टोकाची चूरस निर्माण झाली आहे. यामुळे चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. असाच उत्साह आयपीएलवर जुगार, सट्टा खेळणाऱ्या मध्ये देखील ओसंडून वाहत आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, चिखली ही शहरे आयपीएल जुगाराची मोठी केंद्र आहेत. नुकतेच बुलढाणा शहरातही आयपील जुगार प्रकरणी दोघांना अटक करण्यात आल्याने आता या गोरख धंद्याचा विस्तार झाल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर चिखली नगरीत पोलीस दलाने कारवाई करीत आयपीएल सामन्यावर सट्टे बाजी करणाऱ्या दोघांना अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे याच्या नेतृत्वात नेतृत्वात चिखली पोलिस ठाण्याच्या हद्दीत सट्टेबाजांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. २ सट्टेबाजांना अटक करण्यात आली असून दोघे फरार आहेत. काल शुक्रवारी , २५ एप्रिलच्या रात्री उशिरा चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद हा सामना चांगलाच रंगला. या दरम्यान ही कारवाई करण्यात आली.



चिखली शहर परिसरात दोघे आरोपी बुलेट या दमदार वाहनाचाचा वापर करुन फिरता फिरता सट्टा लावत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय मातोंडकर यांच्या नेतृत्वातील पथक सट्टेबाजांच्या मागावर होते.

गांधी नगरात दोन सट्टेबाज त्यांच्या बुलेट वाहनावर फिरत सट्टेबाजी करत असल्याचे पथकाला दिसल्यानंतर आरोपींना ताब्यात घेण्यात आले. मोहिज खान आत्ता मोहम्मद खान आणि अंकुश कायस्थ अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

हे दोघे आरोपी देशमुख आणि धंदर नामक मोठ्या सटोड्यांच्या संपर्कात होते अशी माहिती प्राथमिक चौकशी निष्पन्न झाले आहे. देशमुख आणि धंदर हे फरार झाले असून पथक त्यांच्या मागावर आहेत.